रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २५३
www.ramprahar.com
सोमवार, ३१ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

मधुमेह, उच्च रक्तदाब रुग्णांना जि.प.कडून मिळणार औषधे/२
रायगडातील धरण क्षेत्रात ४३.९९ टक्के पाणीसाठा/५
जागा देत नाही म्हणून बहिष्कार; गुन्हा दाखल/७

## साईभक्तांना पाच लाखापर्यंत विमा संरक्षण; शिर्डी संस्थानची घोषणा

**शिर्डी** : साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत वर्षभर देशभरातून मोठ्या संख्येने भाविक येत असतात.



येथे येत असताना किंवा परतताना भाविकांसोबत छोट्या मोठ्या दुर्घटना घडतात. या पार्श्वभूमीवर साई संस्थानने साईभक्तांना पाच लाखापर्यंतचे विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी दर्शनाला येण्याअगोदर साई संस्थानच्या अधिकृत वेबसाईटवर नोंदणी करणे बंधनकारक आहे. घरातून निघाल्यानंतर साई मंदिरात दर्शन करेपर्यंत काही अप्रिय घटना घडल्यास पाच लाखांपर्यंतचे विमा कवच संबंधिताला किंवा त्याच्या कुटुंबियांना मिळणार आहे. विम्याचा कालावधी एक वर्षीसाठी असणार आहे, परंतु प्रत्येक भाविकाला दरवेळेस शिर्डीत येताना वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक राहाणारा आहे, अशी माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

# तरुणाई देशाची सर्वात मोठी संपत्ती

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नागपूरमध्ये प्रतिपादन

**नागपूर : प्रतिनिधी**

भारताची सर्वात मोठी संपत्ती ही आजची तरुणाई आहे. भारतातील तरुण-तरुणींमध्ये आत्मविश्वास आहे. त्यामुळे ते २०४७पर्यंत विकसित भारताच्या ध्येयाचा झेंडा हाती धरतील, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. ३०) येथे केले.

गुढीपाडवा आणि नवीन वर्षाच्या प्रारंभी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपूरमध्ये माधव नेत्र रुग्णालयाची पायाभरणी केली. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधानांनी जाहीर सभेच्या सुरुवातीला सर्वांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांनी




विविध सण आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रवासाच्या १००व्या वर्षाबद्दल देशवासीयांना संबोधित केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, जर आपण आपल्या देशाच्या इतिहासावर नजर टाकली, तर आपण शेकडो वर्षे गुलामगिरीत जगलो. इतके हल्ले झाले. भारताची सामाजिक रचना नष्ट करण्याचेदेखील अनेकदा प्रयत्न झाले, परंतु भारताची जाणीव कधीच संपली नाही. सर्वात कठीण काळातही आपल्या संतांनी भक्तीच्या कल्पनांनी आपल्या राष्ट्रीय चेतनेला नवीन ऊर्जा दिली.

देशातील सर्वात गरीब व्यक्तीलाही सर्वोत्तम उपचार मिळाले पाहिजेत. त्यामुळेच आम्ही आयुष्यमान भारत योजनेद्वारे लोकांना मोफत उपचारांची सुविधा देत आहोत, असे पीएम म्हणाले.

### 'संघासाठी सेवा हीच साधना'

*या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कौतुक करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, १०० वर्षांपूर्वी लावले गेलेले संघाचे रोपटे आता वटवृक्ष बनले आहे. हा सामान्य वटवृक्ष नाही, तर भारताचा अक्षय वटवृक्ष बनला आहे, जो भारतीय संस्कृती आणि राष्ट्रीय चेतनेला ऊर्जावान बनवत आहे. संघासाठी सेवा हीच साधना आहे. आमचा मंत्र देवापासून देश आणि रामापासून राष्ट्र आहे. 'सेवा' ही भावना स्वयंसेवकांना थकू देत नाही. राष्ट्र यज्ञाच्या या पवित्र अनुष्ठानात मला आज येथे येण्याचे सौभाग्य मिळाले आहे.*



# धनिणीची बाग 'रयत'ची पंढरी -लोकनेते रामशेठ ठाकूर

## रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांचा पुण्यतिथी कार्यक्रम

**सातारा : प्रतिनिधी**

ज्या प्रमाणे वारकऱ्यांना पंढरीत गेल्यावर आनंद होतो, तोच आनंद आम्हाला धनिणीच्या बागेत आल्यावर होतो. त्यामुळे धनिणीची बाग ही रयत शिक्षण संस्थेची पंढरी आहे, असे उद्गार संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, थोर देणगीदार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी (दि. २९) येथे काढले. रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या ९५व्या पुण्यतिथी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकात दळवी यांच्या अध्यक्षेखाली झालेल्या या कार्यक्रमास संघटक डॉ. अनिल पाटील, सचिव विकास देशमुख, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, आदी मान्यवर उपस्थित होते.

कर्मवीर अण्णा, लक्ष्मीवहिनी यांच्या वसतिगृहातील प्रसंगावर आधारित रेखाटलेल्या म्युरल शिल्पाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी त्यांनी शाहू बोर्डिंगसाठी ५० लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डॉ. अनिल पाटील यांचे कौतुक केले. ते म्हणाले, डॉ. अनिल पाटील यांनी शाहू बोर्डिंगला नवे रूप दिले आहे. बोर्डिंगमधील शिस्त, नीटनेटकेपणा जगाने शिकण्यासारखा आहे. डॉ. पाटील यांच्या प्रयत्नातून धनिणीच्या बागेत डिजिटल चलचित्राच्या स्वरूपात कर्मवीर अण्णांचे चरित्र रेखाटले आहे. यातून अनेकांना रयत शिक्षण संस्थेचा इतिहास माहीत होणार आहे.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी सांगितले की, वहिनींना अधिक आयुष्य लाभले असते तर संस्थेचे आजचे चित्र आणखी वेगळे दिसले असते. कर्मवीरांना रयत माऊलींनी दिलेली साथ अत्यंत महत्त्वाची आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी जे कार्य केले तसेच कार्य कर्मवीर अण्णा व लक्ष्मीबाई यांनी केली आहे. लक्ष्मीवहिनींच्या निधनानंतरही कर्मवीर अण्णांनी संस्थेसाठी रात्रंदिवस काम केले. वहिनींची साथ अधिक मिळाली असती, तर संस्था आणखी पुढे गेली असती.

या वेळी चेअरमन दळवी यांनी डॉ. अनिल पाटील यांचे कौतुक केले तसेच त्यांना कर्मवीर अण्णा, रयतमाऊली लक्ष्मीबाई आणि रयत शिक्षण संस्था यावर एक पुस्तक लिहून आपले ज्ञान सर्वांपर्यंत पोहचवण्याची विनंती केली.

संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील म्हणाले की, लक्ष्मीवहिनींना अवघ्या ३६ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांनी अंगावरील सर्व दागिने वसतिगृहातील मुलांसाठी खर्च केले. शेवटचा दागिना मंगळसूत्र तेही विकून टाकले. या त्यागावरच संस्था उभी आहे. **(पान २ वर..)**

## शोभायात्रांनी नववर्षाचे जल्लोषात स्वागत

**अलिबाग : प्रतिनिधी**

मराठी नववर्षाचा पहिला दिवस अर्थात गुढीपाडवा रविवारी (दि. ३०) रायगड जिल्ह्यात मोठ्या उत्साही आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा झाला. जिल्ह्याच्या सर्वच भागात शोभायात्रा काढून नवीन वर्षाचे स्वागत करण्यात आले.

गुढीपाडव्यानिमित्त घरोघरी मंगलमय वातावरण होते. सकाळी दारात गुढी उभारून तिचे पूजन करण्यात आले. पुरणपोळी तसेच कडुनिंबाचा पाला व गुळ



यांचा नैवेद्य दाखवण्यात आला. वाहनांचीदेखील पूजा करण्यात आली. दुपारच्या जेवणात श्रीखंडपुरीचा बेत होता.

गुढीपाडव्यानिमित्त अलिबाग शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कोळीवाड्यातील मरूआई मेटपाडा गोविंदा पथकाने स्पॅनिश पद्धतीने मानवी मनोरा रचत उपस्थितांची वाहवा मिळवली. त्याचप्रमाणे विविध मंडळांनी शिवकालीन मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर केली. कुलाबा ढोलपथक आणि मंगलमूर्ती ढोलपथकांच्या वादनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## महाडमध्ये टेम्पोला अपघात; १७ प्रवासी जखमी

**महाड** : तालुक्यातील पंढरपूर मार्गावर आकले गाव हद्दीत रविवारी (दि. ३०) दुपारी ११.४५च्या सुमारास चालकाचे नियंत्रण सुटल्याने एक टेम्पो उलटला. या अपघातात १७ प्रवासी जखमी झाले असून जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

महाडमधील काळीज आदिवासीवाडीवरून मंडणगड (रत्नागिरी) येथे साखरपुड्यासाठी १७ प्रवासी घेऊन जाणारा टेम्पो हा चालकाचे नियंत्रण सुटून तालुक्यातील आकले गाव हद्दीत पंढरपूर मार्गावर रस्त्याच्या कडेला उलटला. या अपघातातील सोहम वाघे हा ११ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला आहे. जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, अपघाताची नोंद महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## निवडक

### हिमाचल प्रदेशातील मणिकर्णमध्ये भूस्खलन; सहा जणांचा मृत्यू

**मणिकर्ण** : म्यानमार आणि बँकॉकमध्ये दोन



दिवसांपूर्वी भीषण भूकंप आला. या भूकंपाचे धक्के भारतापर्यंत जाणवले. अशात हिमाचल प्रदेशातील मणिकर्णमध्ये रविवारी (दि. ३०) पर्यटकांची वाहने जात असताना भूस्खलन झाले. यात कारमधील सहा जणांचा मृत्यू झाला आहे. जखमींना कुल्लूच्या हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहे.

### छत्तीसगडमधील ५० नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण; गृहमंत्र्यांकडून स्वागत

**नवी दिल्ली** : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६पर्यंत देशातून नक्षलवाद संपवण्याचा प्रण घेतला आहे. अशातच विजापूरमध्ये रविवारी (दि. ३०) तब्बल ५० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करुन हिंसाचाराचा मार्ग सोडला आहे. स्वतः गृहमंत्र्यांनी ही माहिती दिली. त्यांनी या ५० नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणाच्या निर्णयाचे स्वागत केले असून या सर्वांचे पुनर्वसन करून त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेतले जाईल, असे सांगितले.

## गुढीपाडव्यानिमित्त राज्यात ८६ हजार ८१४ वाहनांची नोंदणी



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात दुचाकी, चारचाकी व अन्य वाहनांच्या नवीन खरेदीची नोंदणी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मागील सात दिवसांत मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहे. नवीन वाहन खरेदीची नोंदणी २०२४च्या तुलनेत या वर्षी तब्बल ३० टक्के जास्त वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे.

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अनेक नागरिक नवीन वाहनांची खरेदी करीत असतात. या वाहनांची नोंदणी संबंधित प्रादेशिक परिवहन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अंतर्गत करण्यात येते. नागरिकांमध्ये वाहन खरेदीचा उत्साह दिसून येत असून या वर्षी ८६ हजार ८१४ वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे. तब्बल २० हजार ५७ वाहने मागील वर्षाच्या तुलनेत अधिक खरेदी करण्यात आल्याचे आकडेवारीवरून दिसून येते.

चारचाकी कार प्रकारात २२ हजार ८१ वाहनांची नोंदणी करण्यात आली असून ही मागील वर्षीच्या तुलनेत चार हजार ९४२ने जास्त आहे. मोटरसायकल, स्कूटर या दुचाकी वाहन प्रकारात ५१ हजार ७५६ नवीन वाहनांची खरेदी नागरिकांकडून करण्यात आली आहे. मागील वर्षी हीच खरेदी ४० हजार ६७५ एवढी होती. यामध्येही ११ हजार ८१ने वाढ नोंदविण्यात आली आहे.

राज्यात सर्वात जास्त पहिल्या पाच परिवहन कार्यालय अंतर्गत वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे. त्यामध्ये पुणे परिवहन कार्यालय अंतर्गत ११ हजार ५६, पिंपरी चिंचवड कार्यालय अंतर्गत सहा हजार ६४८, नाशिक अंतर्गत तीन हजार ६२६, मुंबई (मध्य) कार्यालय अंतर्गत तीन हजार १५४ आणि ठाणे कार्यालय अंतर्गत तीन हजार १०७ वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे.

## रायगडात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर तीन हजार १७७ कुटुंबांचा गृहप्रवेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील घरकुल योजनेतील लाभार्थी तीन हजार १७७ कुटुंबांचा गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर रविवारी (दि. ३०) गृहप्रवेश करण्यात आला.

केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजनेंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत घरकुलांना मंजुरी देण्यात आली होती. लाभार्थी कुटुंबीयांना गृहप्रवेश करण्यासाठी गावागावात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगाने अलिबाग तालुक्यातील वरसोली येथे आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रमात गावामधील चार कुटुंबांचा गृहप्रवेश कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपवनसंरक्षक राहुल पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक



प्रियदर्शिनी मोरे, जि.प. मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, अलिबाग पंचायत समिती गटविकास अधिकारी दाजी दाईंगडे, माजी सरपंच मिलिद कवळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यात केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनेंतर्गत मागील काही दिवसांत मोठ्या संख्येने घरकुलांची कामे हाती घेण्यात आली आहेत. कामे वेळेत पूर्ण करून लाभार्थी कुटुंबांना ताबा देण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बास्टेवाड व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

### गृहप्रवेश झालेली तालुकानिहाय घरकुले

अलिबाग तालुक्यात ३२२ कुटुंबांचा गृहप्रवेश झाला असून कर्जत १५६, खालापूर ९८, महाड ३२७, माणगाव ४५३, म्हसळा १०२, मुरूड १५४, पनवेल १४७, पेण ४०२, पोलादपूर ९७, रोहा ४५६, श्रीवर्धन ५०, सुधागड ३१७, तळा ५७, उरण ३९ कुटुंबांचा गृहप्रवेश गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर झाला.

जिल्ह्यात घरकुल योजनांतर्गत तीन हजार १७७ घरकुले बांधून पूर्ण झाली आहेत. या घरकुलांमध्ये लाभार्थी कुटुंबियांचा गृहप्रवेश गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर करण्यात आला. यासाठी गावागावात ग्रामपंचायतींच्या माध्यमातून गृहप्रवेश कार्यक्रमांचे आयोजन करून लाभार्थी कुटुंबियांचा गृहप्रवेश करण्यात आला.

> *केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यात तीन हजार १७७ घरकुलांचे बांधकाम करण्यात आले आहे. या घरकुलांत गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर एकाच दिवशी गृहप्रवेश करण्यात आला. यासाठी गावागावात गृहप्रवेश कार्यक्रम घेण्यात आले आहेत. जिल्ह्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात गृहप्रवेश होण्याची ही पहिलीच वेळ आहे.*
>
> **-डॉ. भरत बास्टेवाड,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

> *आज आम्हाला निवारा प्राप्त झाला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून घरकुल योजनेतून आम्हाला घर बांधून मिळाले. याबाबत प्रशासनाचे आभार!*
>
> **-अरुणा पवार,** लाभार्थी, वरसोली

## पेणमध्ये उभारली स्त्री अस्मितेची गुढी





**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये अंकुर ट्रस्ट आणि महिला अत्याचारविरोधी मंचच्या वतीने स्त्री अस्मितेची व संविधानाची गुढी उभारण्यात आली. या उपक्रमात शहरातील तसेच ग्रामीण भागातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

दरवर्षी पेण शहरातील कष्टकरी महिला आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या शिक्षित महिला वाजतगाजत, नाचत-गात महात्मा गांधी वाचनालयाच्या प्रांगणात गुढी उभारणी करतात. गेल्या १३ वर्षांपासून सुरू असलेला हा उपक्रम केवळ सण नसून स्त्री अस्मितेचे प्रतीक बनत चळवळीच्या रूपात विकसित झाला आहे. यंदा तरुणींनी संविधान जागृती अभियान राबवण्याची घोषणा केली तसेच सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या लैंगिक हिंसाचाराच्या अनुषंगाने 'सेफ्टी ऑडिट' करण्याचा निर्णय घेण्यात आला.

गुढी उभारणीच्या मिरवणुकीत मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. कृषी उत्पन्न बाजार समितीपासून वाजतगाजत निघालेल्या मिरवणुकीत महिलांनी आत्मसन्मान देणारे घोषवाक्य असलेले फलक हातात घेतले होते. या मिरवणुकीचा समारोप महात्मा गांधी वाचनालयाच्या प्रांगणात करण्यात आला. या वेळी भारती पवार, मानसी बापट, रजनी गायकवाड, स्वाती मोहिते, गौरी कातकरी, वंदना वाघमारे, सयोंगिता टेमघरे आणि इतर महिला कार्यकर्त्यांनी गुढी उभारली.

दारी उभारलेली गुढी ही विजय आणि समृद्धीचे जसे प्रतीक आहे तसेच समाजातील वंचित महिलांनी सार्वजनिकरित्या उभारलेली गुढीही परिवर्तनाची आणि रचनात्मक संघर्षाची नांदी आहे, असे प्रतिपादन या वेळी सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले.

कार्यक्रमात आई डे केअर, चाईल्ड हेवन, अंकुर ट्रस्टच्या मुलींनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करीत गुढीला मानवंदना दिली. इनरव्हील क्लबच्या सदस्यांसह विविध राजकीय पक्षांच्या महिला कार्यकर्त्यांनीही उपस्थिती दर्शवली.



# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी थेट आणि वेगवान कनेक्टिव्हिटी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आता फक्त ४५ मिनिटांत ठाणे गाठता येणार आहे. सिडको २६ किमीचा उन्नत मार्ग बांधणार आहे. येत्या जून महिन्यात लोकनेते दि.बा पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिले विमानोड्डाण करण्याचा संकल्प सिडकोने सोडला आहे. विमानतळाची मुंबई, ठाणे आणि परिसराशी कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी सिडको आणि एमएमआरडीएने कंबर कसली आहे.

यासाठी ठाणे शहराला विमानतळाशी जोडण्यासाठी २६ किमी लांबीचा उन्नत मार्ग तयार करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती



घेतला आहे. सिडकोने प्रस्तावित केलेल्या २६ किमी उन्नत मार्गाची सुरुवात दिघ्यातील पटणी चौकापासून होणार आहे. यामध्ये पहिला टप्पा वाशीपर्यंत १७ किमी लांबीचा असेल, जो ठाणे–बेलापूर मार्गाला समांतर जाईल. त्यानंतर वाशी ते नवी मुंबई विमानतळापर्यंतचा नऊ किमीचा मार्ग उन्नतच असेल आणि तो डबल डेकर स्वरूपात बांधण्याचे नियोजन आहे. या संपूर्ण प्रकल्पावर अंदाजे आठ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

वाशी ते विमानतळाच्या मार्गावर खारफुटी आणि सीआरझेड क्षेत्रामुळे काही अडथळे येऊ शकतात. सिडकोला यासाठी आवश्यक परवानग्या घ्याव्या लागतील तसेच उलवे नदीवरील बंधारा तोडून पूल बांधण्याचा प्रस्तावही मंजूर करण्यात आला आहे. वनविभागाने ४८५९ चौरस मीटर वनजमीन हस्तांतरित करण्यास मंजुरी दिली आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ठाणे शहराचे नवी मुंबई विमानतळाशी थेट आणि वेगवान कनेक्टिव्हिटी साधली जाईल. सिडकोचा हा निर्णय नागरिकांसाठी प्रवास सोपा आणि सुखकर करणारा ठरणार आहे.

# मधुमेह व उच्च रक्तदाब रुग्णांना जिल्हा परिषदेकडून मिळणार औषधे

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात उच्च रक्तदाबाचे ३४ हजार ४७, तर २१ हजार ३९९ मधुमेह रुग्ण आहेत. या रुग्णांची काळजी घेण्यासाठी रायगड जिल्हा परिषद सरसावली असून, रुग्णांना तीन महिन्यांचा आवश्यक औषधांचा एन.सी.डी. कीट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पात एक कोटी २५ लाख रुपयांची तरतूद केली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या संकल्पनेतून



ही योजना राबविण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्याची लोकसंख्या २६ लाख ३४ हजार २०० आहे. जिल्ह्यात ग्रामीण भागात ५५ प्राथमिक आरोग्य केंद्र, २८० उपकेंद्र, सात जिल्हा परिषद दवाखाने, तीन प्राथमिक आरोग्य पथके कार्यरत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर उच्चरक्तदाब, मधुमेह आजारावरील औषधे देण्यात येतात. उपलब्धतेनुसार रुग्णांना औषधे देण्यात येत असल्याने, ही औषधे संपल्यानंतर दुर्गम भागातील काही रुग्ण सतत आरोग्य केंद्रात येऊन औषधे नेण्यास चालढकलपणा करतात. यामुळे औषधाअभावी या रुग्णांना इतर आजारांचा सामना करावा लागण्याची शक्यता असते. यामुळे जिल्हा परिषद सेस नाविण्यपुर्ण योजनेअंतर्गत उच्चरक्तदाब, मधुमेह रुग्णांना एका वेळी तीन महिने पुरेल एवढा औषधसाठा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्ह्यातील उच्च रक्तदाबाच्या ३४ हजार ४७ तर मधुमेहाचे २१ हजार ३९९ रुग्णांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. सध्या रुग्णांना देण्यात येणाऱ्या औषधांचे कीट तयार करण्यात आले असून १ एप्रिलपासून रुग्णांना या कोटाचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून प्राप्त झाली आहे.

# न्हावे सासणे येथे हरिनाम सप्ताह

**मुंबई : प्रतिनिधी**

सलग १३व्या वर्षी श्रीराम नवमीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन ठाणे मुरबाड तालुक्यातील न्हावे सासणे येथे ४ ते ७ एप्रिल या कालावधीत आयोजन केले आहे.

हभप भाग्यश्री भाग्यवंत, हभप धनाजी महाराज, हभप योगेश लांबे महाराज, हभप आरती शिंगोळे या नामवंत किर्तनकारांची किर्तने आयोजित केली आहेत. तसेच रामविजय ग्रंथाचे पारायण हरीपाठ भजन हे तिन दिवस चालणार आहे. या कार्यकमाचे संयोजन लोकमित्र रमेश हिंदुराव हे १३ वर्ष करीत असून या अमृत पर्वाचा सर्वांनी लाभ घ्यावा व तन मन धनाने या सप्ताहात मदत करावी, असे आवाहन रमेश हिंदुराव यांनी केले आहे. या सप्ताहाचे संयोजन लोकमित्र रमेश हिंदुराव हे गेली १३ वर्षे करत असून, त्यांनी या अमृत पर्वाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी तन, मन आणि धनाने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

# आदिवासी बांधवांना घरकुले प्रदान

**चौक : प्रतिनिधी**

गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर आदिवासी बांधवांना घरकुले प्रदान करण्यात आली, यामुळे आदिवासी भागात आनंदी वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रुप ग्रामपंचायत कलोते यांनी आदिवासी भागातील आदिवासी बांधवांना प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियान,शबरी घरकुल योजना या घरांच्या कामांचा शुभारंभ आमदार महेश बालदी यांच्या उपस्थिती पार पडला होता. या घरकुलांची कामे जलदगतीने करण्यात आली असून आज या घरांचा ताबा ग्राम पंचायत प्रशासकीय अधिकारी अमित म्हसकर व ग्राम पंचायत अधिकारी निलेश म्हसकर, माजी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ



कलोते ग्रामपंचायतीचा उपक्रम

यांच्या उपस्थितीत हिरा तात्या पवार बापदेव वाडी, अशोक किसन वाघ कांढरोली यांना घरच्या चाव्या प्रदान करण्यात आल्या.

गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर घरे ताब्यात मिळाल्याने लाभार्थी आनंदित होते. या योजने अंतर्गत कामे प्रगतीवर आहेत.

# उरण बसस्थानकात वाचनालयाचे उद्घाटन

**उरण : रामप्रहर वृत्त**

गोवठणै येथील सेवा निवृत्त शिक्षक व गोवठणे कब्बडी संघाचे माजी कर्णधार स्व. मोतिराम बाळकृष्ण वर्तक यांच्या स्मरणार्थ, त्यांचे कनिष्ठ चिरंजीव सचिन वर्तक यांनी वडिलांच्या स्मृती स्मरणार्थ उरण बस स्थानकात वर्तमानपत्र मोफत वाचनालय सुरू केले असून या वाचनालयाचे उद्घाटन सेवानिवृत्त शिक्षक शाम कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

तत्पुर्वी वाहतूक अधिक्षिका गीता रवींद्र कोंडार यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. या वेळी मुंबई विभाग नियंत्रक दत्तात्रेय सुधाकर कुलकर्णी, वरिष्ठ लिपिक दिपक अरूण म्हात्रे, वाहतूक निरीक्षक अमोल सुधाकर दराडे, उरण पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:शाम कडू, समाज प्रबोधन शिक्षण संस्थेचे सचिव रविंद्र म्हात्रे, पत्रकार संघाचे सचिव रामचंद्र म्हात्रे, किर्तनकार भालचंद्र म्हात्रे तसेच वर्तक परिवाराचे सदस्य, मित्र व आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# नववर्षाच्या स्वागतासाठी कर्जतमध्ये स्वागतयात्रा

**कर्जत : प्रतिनिधी**

मराठी नववर्षाच्या स्वागताचा सण म्हणजे गुढीपाडव्या निमित्त कर्जत मधील अनेक संस्था एकत्र येऊन कर्जत शहरात मराठी नववर्ष स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील बहुतांश गावात गुढ्या उभारून गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला.

कपालेश्वर देवस्थान समिती, सार्वजनिक गणेशोत्सव समिती, विश्वहिंदू परिषद, बजरंग दल, प्रजापती ब्राह्मकुमारी ईश्वरी विश्व विद्यालय, शिवतांडव प्रतिष्ठान ढोल ताशा पथक आदींनी एकत्र येऊन स्वागत यात्रेचे आयोजन केले होते. टिळक चौकातून या स्वागतयात्रेचा शुभारंभ करण्यात आला.

या शोभायात्रेत माजी नगराध्यक्ष वनिता म्हसे, स्नेहा गोगटे, साईनाथ श्रीखंडे, अभिजित मराठे, दिलीप गडकरी, आशिष गोखले,



विशाल जोशी, पद्माकर गांगल, महेंद्र बोडके, ज्योती कडू, सायली जोशी, नमीत दांडेकर, महेश निघोजकार, किर्तीमाला, विनायक उपाध्ये, उमा डोंगरे, दिव्या ढुमणे, केदार भडगावकर, नितीन पावाळी, ॲड. अभिषेक तिवारी, प्रतीक पाटील, कुणाल जाधव, राज गोडबोले आदी कर्जतकर उपस्थित होते.

ही स्वागत यात्रा कर्जत शहरातील मुख्य बाजार पेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटील आळी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे पुन्हा टिळक चौकात आली आणि श्री कपालेश्वर मंदिरात सामुदायिक आरती करून सांगता करण्यात आली. या स्वागत यात्रेत ढोल पथकांनी उपस्थितांचे मन जिंकले. विशेषतः युवतींनी ढोल वाजवून आपली चमक दाखवून दिली. मिरवणुकीत शिशु मंदिर शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्री राम, सीता, लक्ष्मण, मावळे आदींची वेशभूषा करून कर्जतकरांची मने जिंकली. प्रजापती ब्राह्मकुमारी ईश्वरी विश्व विद्यालय यांनी चित्ररथ साकारला होता.

# अलिबागमध्ये गुढीपाडवा शोभायात्रा





**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हयात सर्वत्र नववर्ष स्वागत यात्रा काढण्यात आल्या. अलिबाग शहरात नववर्ष स्वागत यात्रा समितीने दरवर्षी प्रमाणे ब्राम्हणआळी येथील श्रीराम मंदिरापासून स्वागत यात्रा काढली. ढोलताशांच्या गजरात हातात भगवे झेंडे आणि डोक्यावर भगवे फेटे बांधून महिला, पुरूष, युवक, युवती मोठया संख्येने यात सहभागी झाले होते. स्वागतयात्रेत वेगवेगळे चित्ररथदेखील सहभागी झाले होते.

शहरात ठिकठिकाणी स्वागतयात्रेचे स्वागत करण्यात आले. संपूर्ण शहरभर फिरून श्रीकाशीविश्वेश्वर मंदिराजवळ यात्रेची सांगता झाली. सांगता समारंभास अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, सुनील दामले, प्रा. उदय जोशी उपस्थित होते.

# पुस्तके जगण्याला उभारी देतात –नमिता कीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माणसांचे आयुष्य असलेली पुस्तके जगण्याला उभारी देतात असे प्रतिपादन कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता कीर नवीन पनवेल येथे साहित्याची आनंद वारी कार्यक्रमात केले.

कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखा व श्री.बापूसाहेब डी.डी.विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन,नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या साहित्याची आनंद वारी या साहित्यिक कार्यक्रमांतर्गत कवितेचा जागर, गुढीपाडव्याचे



औचित्य साधून विद्यार्थ्यांनी दिलेल्या पुस्तकांची ज्ञानरूपी गुढीचे मान्यवरांचे हस्ते पूजन, त्याचप्रमाणे सावित्रीच्या लेकी म्हणून कर्तुत्ववान महिला, महिला बचत गट यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविण्यात आले.

कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखा व श्री.बापूसाहेब डी.डी.विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन,नवीन पनवेल यांच्यामध्ये साहित्यिक कार्यक्रमांसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी आदर्श शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष धनराजजी विसपुते, कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील, रायगड जिल्हा कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष सुधीर शेठ, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी उपस्थित होते.

या वेळी गृहउद्योजिका रोहिणी कुरंदेकर,एड. अपर्णा कुलकर्णी – नाडगौंडी,कवयित्री जोशना राजपूत, शिवनेरी महिला बचत गट, तुळजाभवानी महिला बचत गट यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी केले. सूत्रसंचालक संस्कृती डुमरे यांनी केले.

# माणगावात गुढीपाडवा, नववर्षाचा उत्साह

**माणगाव : प्रतिनिधी**

चैत्र शुद्ध प्रतिपदा हिंदू नववर्षाचे माणगाव तालुक्यात अत्यंत उत्साहात स्वागत करण्यात आले. हिंदू परंपरेनुसार घराघरात रांगोळ्या काढून, पाठ मांडून सुवासिनींनी गुढीचे पूजन केले. गोड मिष्टान्न बनवून गुढीस नैवेद्य देऊन एकमेकांना शुभेच्छा दिल्या गेल्या.

दोन दिवसांपासूनच अनेकांनी बांबूची गुढी आपल्या घरी आणून ठेवल्या होत्या. बाजारातही ५० ते १०० रुपयांना गुढ्या विकत मिळत होत्या. सणानिमिताने झेंडूची मोठ्या प्रमाणात मागणी होती.बाजारपेठेत खरेदीचा या निमित्ताने उत्साह होता. झेंडूच्या तयार मालानाही मोठ्या प्रमाणात मागणी होती.

गुढीपाडवा व चैत्र महिन्याचा पहिला दिवस म्हणूनही या दिवसाला आगळे वेगळे स्थान आहे. या गुढीपाडव्या बरोबरच श्री शालिवाहन शके १९४७, विश्वावसू संवत्सराचा प्रारंभ झाला



आहे. समाजमाध्यमावरही यानिमिताने एकमेकांना दोन दिवसापासूनच शुभेच्छा दिल्या घेतल्या जात होत्या.

माणगाव तालुक्यातील काही गावात गुराखीही जंगलात गुढी उभारून नववर्षाचे स्वागत करतात. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात गुढी पाडवा साजरा करण्यात आला.

पान १ वरुन

## धनिणीची बाग 'रयत'ची पंढरी –लोकनेते रामशेठ ठाकूर

वहिनींना जे दागिने केले जायचे ते त्यांचा भाऊ कलगोंडा पाटील करीत होते. त्यांनी केलेल्या दागिन्यांचा उपयोग अण्णांनी संस्थेसाठी केला. सध्या या बार्डिंगमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले राहत असून त्यांच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी संस्थेने स्वीकारली आहे.

या वेळी स्व. कलगौंडा पाटील यांनी केलेल्या समर्पित त्यागाबद्दल त्यांचा मरणोत्तर सन्मान करण्यात आला. हा सन्मान संजीवकुमार पाटील, अशोक कलगौंडा पाटील, अनिल कलगौंडा पाटील यांनी स्वीकारला. धनिणीच्या बागेत डिजिटल स्वरूपात रयत शिक्षण संस्थेच्या महत्त्वाच्या घटना दर्शवणारे बोर्ड, शिल्प इत्यादी करण्यात योगदान देणाऱ्या विनायक संकपाळ, प्रदीप कुंभार, उमेश देशमुख, बाळासाहेब कचरे, किरण कुंभार या कला शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

साहेबराव घाडगे या सेवानिवृत्त शिक्षकाने एक लाख पाच हजार रुपयांची देणगी दिली. पल्लवी सागर वर्धमाने, सहाय्यक विभागीय अधिकारी एन.टी. निकम यांनी बोर्डिंगसाठी प्रत्येकी २५ हजार रुपयांची देणगी दिली. रा.ब. काळे शाळेच्या पालकांनी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांसाठी जमवलेला ७५ हजार रुपयांचा लक्ष्मीफंड संस्थेकडे सुपूर्द केला.

प्रास्ताविक संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी केले. वसतिगृहाचे अधीक्षक प्रशांत गुजरे यांनी अहवालवाचन व सूत्रसंचालन सविता मेनकुदळे यांनी केले, तर आभार सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डी. बी. पाटील, डॉ. मोहन पाटील, कर्मवीर कुटुंबीय, सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, बंडू पवार, प्राचार्य शहाजी डोंगरे, प्राचार्य आर.के. शिंदे आदी उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी कॉलेज माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी लोकनेते रामशेठ ठाकूर

सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज माजी विद्यार्थी संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा शनिवारी (दि. २९) झाली. या वेळी संस्थचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, थोर देणगीदार, मार्गदर्शक, माजी खासदार रामशेठ ठाकूर यांची माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

या सभेस महाविद्यालयाचे प्राचार्य व माजी विद्यार्थी संघ व कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. राजेंद्र मोरे, संघाचे उपाध्यक्ष प्राचार्य आर.के. शिंदे, संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व कार्यकारी मंडळाचे सदस्य शहाजी डोंगरे, मेजर पी.एस. गायकवाड, उपप्राचार्य व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख अनिलकुमार वावरे, संस्थेचे लाईफ मेंबर बोर्डाचे सेक्रेटरी व माजी विद्यार्थी संघ कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रा. संदीप भुजबळ, माजी विद्यार्थी संघाचे सचिव डॉ. अभिमान निमसे आदी उपस्थित होते. सर्वांनी नवनियुक्त अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# बिरवाडी येथून मुलगा हरवला

**महाड : प्रतिनिधी**

बिरवाडी गावच्या जवळील ढालकाठी या गावातील एक अल्पवयीन मुलगा कोणाला न सांगता घरात निघून गेला किंवा कोणी केला त्याला पळवून नेले, अशी तक्रार पालकांनी केली आहे.



महाड तालुक्यातील बिरवाडी या गावालगत असलेल्या ढालकाटी या गावातील आदित्य रोहित पारसे (वय १६) रविवारी (दि.३०) सकाळी ११ वाजता घरातून निघून गेला अथवा कोणतरी अज्ञात व्यक्ती त्याचे अपहरण केले अशी तक्रार त्याची आई ऋतुजा रोहित पारसे (वय ३८) हिने केली आहे. याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलिसांनी १३७(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# पनवेल, उरणमध्ये गुढीपाडवा शोभायात्रा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी नववर्ष स्वागत समिती पनवेल यांच्या संकल्पनेतून यंदाही भव्य गुढीपाडवा शोभायात्रेचा आयोजन करण्यात आले होते. यंदाचे हे २६ वर्ष असून जल्लोषात आणि उत्साहात रविवारी सकाळी ६.३० वाजल्यापासूनच पारंपारिक वाद्यांचा गजर मैदानी खेळ आणि विविध देखाव्यांसह ही शोभायात्रा मोठ्या उत्साहात पार पडली.

यातच मराठी भाषेला मिळालेला अभिषेक दर्जा यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात गुढीपाडवा आणि त्यानिमित्ताने निघालेल्या शोभायात्रा यांना विशेष असं महत्त्व प्राप्त झालेय. शोभायात्रे इतिहास भक्ती आणि सांस्कृतिक याचा अनोखा संगम या पाहायला मिळाला. यात्रेच्या आकर्षणात भर घालण्यासाठी तरुण-तरुणींनी पारंपारिक मराठमोळ्या विषयात अभिमानाने फेटे परिधान करून सहभागी झाले होते. पारंपारिक वेशभूषेतील नागरिक भगव्या ध्वजासह सहभागी झाले होते.



ढोल ताशांच्या निनादात संपूर्ण पनवेल शहर दनानंद गेले.

या शोभायात्रेत विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, सरचिटणीस नितीन पाटील, भाजपचे शहराध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, अमित ओझे, सुमित झुंजारराव, केदार भगत, अमरीश मोकल, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, शहर सरचिटणीस प्रितम म्हात्रे, रूपेश नागवेकर, रघुनाथ बहिरा, उमेश पोद्दार, कल्पना राऊत यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने या शोभायात्रेत सहभागी झाले होते.

**उरण : वार्ताहर,**
**प्रतिनिधी, बातमीदार**

उरण मध्ये सकल हिंदू समाज उरणच्या वतीने गुढीपाडव्यानिमित्त भव्य दिव्य अशी शोभा यात्रा काढण्यात आली. या वेळी प्रमुख पाहूणे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून शोभा यात्रेला सुरुवात झाली.

शुक्ल १, प्रतिपदा शके १९४६ हिंदू नव वर्ष दिन रविवारी (दि.३०) रोजी सकाळी महाराष्ट्र भूषण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी शाळा पेन्शनर्स पार्क येथून सुरुवात जाली पुढे उरण शहर, गणपती चौक, विमला तलाव, एन आय हायस्कूल, डॉ.नानासाहेब धर्माधिकारी शाळा पेन्शनर्स पार्क येथे संगता समारोप करण्यात आला.

शोभयात्रेत सर्वच स्तरातील, विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. वादन एक कला ढोल ताशा पथकाच्या ढोल ताशाने उरण परिसर दुमदुमून गेले. शोभायात्रेत पारंपरिक भजन, एन आय हायस्कूल शाळेचे लेझिम पथक व महिलांनी काढलेल्या बाईक रॅलीमुळे शोभायात्रेला शोभा आली. विविध मर्दानी खेळ व साहसी खेळ दाखवून विद्यार्थ्यांनी सर्वांची मने जिंकली. या शोभा यात्रेत विविध वेशभूषा परिधान करून विद्यार्थी नागरिक सहभागी झाले होते.



या शोभयात्रेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, एन आय हायस्कूल उरण, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरण, आर्ट ऑफ लिविंग उरण, उरण महिला सामाजिक शैक्षणिक संस्था उरण, वुमन क्लब उरण, माई फॉउंडेशन उरण, अरीत फॉउंडेशन उरण, कुटुंबिनी महिला संघ उरण, मी उरणकर ढोल ताशा पथक उरण, वादन एक कला ढोल ताशा पथक, सद्गुरू श्री अनिरुद्ध उपासना केंद्र उरण, सद्गुरू श्री नरेंद्र महाराज उपासना केंद्र उरण, इस्कॉन संघटना उरण, वारकरी संप्रदाय उरण, उरण तालुका मराठी पत्रकार संघ, कै आश्विन पाटील मित्र मंडळ उरण,योगा विथ पूनम ग्रुप, उरण सामाजिक संस्था, उरणमधील विविध सामाजिक संस्था संघटना, दिव्यांग ग्रुप आदी संस्था संघटनेचे पदाधिकारी सदस्य शोभायात्रेत मोठया संख्येने उपस्थित होते.



उरण महिला सांस्कृतिक शैक्षणिक सामाजिक संस्था वतीने पारंपारिक वेशभूषा स्पर्धा घेण्यांत आली होती. त्यांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देवून सन्मानित करण्यात आले.

अश्विन पाटील मित्र मंडळ यांनी सर्वांना थंड पेय दिले, त्रिलोचनचे सुमिध पाटील यांनी भागवत गीताचे वाटप केले. दिनेश ठक्कर यांनी पिण्याचे पाणी, अजित भिंडे व हितेश ठक्कर यांनी थंड पेय आदींनी दिले.





पनवेल : करंजाडे येथील पुष्पक नोडमध्ये रायगड मेडिकल असोसिएशनच्या वतीने श्री. रामशेठ ठाकूर रायगड मेडिकल भवन साकारण्यात येणार आहे. या भवनाचे भूमिपूजन गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. भूमिपूजन सोहळ्याला माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, डॉ. रमेश पाटील, डॉ. अनिल परमार, डॉ. राजेश सकपाळ, डॉ. समीर सहस्रबुद्धे, डॉ. प्रमोद गांधी, डॉ. गिरीश जोशी, डॉ. सचिन पवार, डॉ. अमित पाटील, डॉ. निशिकांत आठवले, डॉ. चांदुरकर, डॉ. नवल साधू, डॉ. हेमंत घागोलीय, डॉ. आशुतोष कुलकर्णी, डॉ. संतोष आगलावे आदी उपस्थित होते.



उलवे नोड : गुढीपाडव्यानिमित्त अनेक नवीन कामांचे भूमिपूजन, नवीन व्यवसायाची सुरुवात सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात केली जाते. उलवे नोडमध्येही तोडेकर केक अँड बेकरी या नावाने नवीन व्यवसाय सुरू करण्यात आला आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या केक बेकरीचे उद्घाटन रविवारी झाले. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे तसेच संकल्प घरत, बबलू पांचाळ, आकांक्षा तोडेकर, आदित्य तोडेकर, शिवसेना उपशहरप्रमुख महेश चोरगे, नगरसेवक प्रशांत वलम, उद्योगपती सुनील ओंकारे, मनीषा तोडेकर, सुरेश तोडकर आदी उपस्थित होते.



नवीन पनवेल : डॉ. गोपाळ शितोळे व डॉ. सोनिया केकाने-शितोळे यांनी श्री स्वामी समर्थ डेंटल क्लिनिक रविवारी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सुरू केले आहे. भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी या क्लिनिकला भेट देत डॉ. शितोळे यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



पनवेल : गुढीपाडवा शोभायात्रेनिमित्त ॐ चैतन्य कानिफनाथ मित्र मंडळ, टपाल नाका यांच्या वतीने केशर लस्सीचे वाटप करण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, मंगेश पिलविळकर, विलास गायकवाड, डी.आर. भोईर, संदेश भोईर, कुणाल खैरे, गोपाळ भोईर, विजय शिंदे, चैतन्य सोनवणे, नमित कल्याणकर, मंथन पिलविळकर आदी उपस्थित होते.



पनवेल : दापोली येथे दरवर्षी गुढीपाडव्यानिमित्त विष्णू लक्ष्मी गुढीपाडवा पालखी महोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदाचे या पालखी सोहळ्याचे ४४वे वर्षे आहे. पालखी महोत्सव सोहळ्याला रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, प्रीतम म्हात्रे यांच्यासह मान्यवरांनी भेट दिली. या वेळी माजी सरपंच सुभाष म्हात्रे, माजी उपसरपंच गजानन पाटील, माजी सरपंच प्रकाश पाटील, भाजप उत्तर रायगड उपाध्यक्ष राकेश गायकवाड, सरपंच रूपेश गायकवाड, मुकेश माळी, नितेश जितेकर, रोशन जितेकर, रोशन म्हात्रे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

## विश्वासाचा पाया रचला की व्यवसाय वाढीस लागतो -आमदार महेश बालदी



**चौक : प्रतिनिधी**

विश्वासाचा पाया रचला की ग्राहक आपल्याकडे येतो आणि व्यवसाय वाढीस मदत होते, त्यामुळे ग्राहक संतुष्ट राहील याकडे लक्ष द्यावे, असे प्रतिपादन उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी केले आहे.

सागर जयंतीलाल ओसवाल यांच्या चौक बाजारपेठ मधील भव्य वातानुकूलित कामधेनु गोल्ड शाखा २ या सोन्या चांदीच्या दुकानाचे उद्घाटन गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर करताना शुभेच्छा देताना आमदार महेश बालदी बोलत होते. या वेळी ग्रामीण बाजारपेठ मध्य ग्राहकांच्या सेवेसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर दुकान उपलब्ध करून दिल्या बद्दल सागर जयंतीलाल ओसवाल यांचे कौतुकदेखील केले.

या वेळी उद्योगपती नितीन देशमुख, भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, भारतीय जनता पक्षाचे नेते विनोद भोईर, अभिजित देशमुख, हेमंत माने यांच्यासह स्थानिक नेते, मित्र परिवार आणि ग्राहक उपस्थित होते. या वेळी सागर जयंतीलाल ओसवाल यांनी आमदार महेश बालदी यांना त्यांचेच काढलेले तेल चित्र भेट म्हणून दिले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा मराठी विभाग आणि भाषा मंडळ यांच्या वतीने प्राचार्य शंकरराव उर्फ बापूसाहेब उनउने राष्ट्रीय मराठी आणि कोकणी बोलीभाषा कविता लेखन स्पर्धेचे आयोजन २०२४ साली करण्यात आले होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा आणि बोलीगंध प्रातिनिधीक कवितासंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, सहसचिव प्राचार्य डॉक्टर राजेंद्र मोरे, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी देशमुख, सहसचिव प्राचार्य डॉक्टर शिवलिंग मेनकुंदळे, प्राध्यापक डी.एन माने, प्राध्यापक डॉ. सुभाष वाघमारे, मीनल उनउने, डॉ. विद्या नावडकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.





पनवेल : भाजप तालुका चिटणीस यतिन पाटील यांनी घेतलेल्या पोकलनची पूजा गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आली. या वेळी माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, ॲड. मनोज भुजबळ, माजी नगराध्यक्ष तथा भाजप शहर उपाध्यक्ष संदीप पाटील, माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील तसेच सुरदास गोवारी, बुवा भगत, राजेश पाटील, दिवेश भगत, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# उदंड उत्साह

मराठी कालगणनेतील नववर्षाचा पहिला दिवस म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा. हा दिवस रविवारी मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने ठिकठिकाणी शोभायात्रा काढण्यात आल्या होत्या. यामध्ये नागरिकांनी सहभागी होऊन नववर्षाचे जोरदार स्वागत केले.

**वसंत ऋतूच्या पहिल्या दिवशी गुढीपाडवा साजरा केला जातो. या काळात शिशिराची पानगळ संपलेली असते अन् झाडांना नवी पालवी फुटताना वातावरणात चैतन्य पसरलेले असते. ब्रह्मदेवाने या दिवशी विश्व निर्मिले असे सांगितले जाते. प्रभू श्रीरामाने रावणावर विजय मिळवून ज्या दिवशी अयोध्येत पुन्हा प्रवेश केला त्या दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला नागरिकांनी गुढ्या उभारून उत्सव साजरा केला अशीही अख्यायिका आहे, तर शालिवाहन नावाच्या कुंभाराच्या मुलाने शकांचा पराभव करण्यासाठी सहा हजार मातीच्या सैनिकांचे पुतळे तयार केले व त्यात प्राण घालून त्यांच्या सहाय्याने याच दिवशी शकांचा पराभव केला अशी आख्यायिका प्रचलित आहे. याच शालिवाहन राजाच्या नावाने नवीन कालगणना शालिवाहन शक सुरू झाला. गुढीपाडव्यापासूनच राम जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाचासुद्धा प्रारंभ होतो, जो पुढे हनुमान जयंतीपर्यंत चालू असतो. गुढीपाडवा आणि शोभायात्रा असे एक समीकरण अलिकडच्या काळात पहावयास मिळते. पूर्वी डोंबिवलीतील फडके रोडवर निघणारी मराठमोळी शोभायात्रा आता जवळपास सर्वच शहरांमध्ये निघते. यंदाही हे दृष्य दिसून आले. या शोभायात्रेत लोक पारंपरिक वेशभूषा करून सहभागी झाले होते. चित्ररथ, देखावे यात आकर्षण ठरले. याशिवाय लेझिम, ढोल ताशा यांसारखी पथके लक्ष वेधून घेत होती. यानिमित्ताने मुलांनी मर्दानी खेळ तसेच मल्लखांबाची प्रात्यक्षिके सादर केली. चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे, मावळे, विठ्ठल रखुमाई, वारकरी यासह वैशिष्ट्यपूर्ण वेश परिधान केले होते. काहींनी हातात फलक घेऊन विविध विषयांवर जनजागृतीपर संदेश दिले. एकीकडे हा सारा उत्साह असताना घरोघरी मंगलमय वातावरणात गुढ्या उभारण्यात आल्या. दारात गुढी उभारून विधीवत तिचे पूजन केले गेले. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते. पुरुष मंडळी गुढी उभारण्यात व्यस्त असताना गृहिणींची स्वयंपाकाची लगबग होती. महिलांनी पुरणपोळी, श्रीखंड पुरीचा बेत केला होता. शालिवाहन संवत्सराचा हा प्रथम दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इत्यादी गोष्टी केल्या जातात. या अनुषंगाने मोठी आर्थिक उलाढाल झाली. नवीन गाड्या खरेदीसाठी शोरूम्समध्ये तरुणांची गर्दी होती, तर सराफांची दुकाने महिलांनी गजबजून गेली होती. विशेष म्हणजे या दिवशी गृहप्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. राज्य व केंद्र शासनाने सर्वसामान्यांच्या निवासासाठी घरांच्या विविध योजना आणल्या आहेत. त्या माध्यमातून गरीबांचे घराचे स्वप्न पूर्ण होत आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अशा लाभार्थ्यांचाही गृहप्रवेश झाला. नव्या वर्षाच्या प्रारंभीचा दिवस आनंदात घालविला की पुढील वर्ष चांगले जाते, अशी आपल्या लोकांची पूर्वापार श्रद्धा आहे. त्यामुळे या दिवशी सर्वत्र आनंदाचे वातावरण दिसून आले. यंदा या दिवशी सुट्टीचा वार रविवार आल्याने आबालवृद्धांचा आनंद द्विगुणित झाला.**

# रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील

भारतात ज्या त्यागी, सेवाभावी, स्त्रिया होऊन गेल्या त्यामध्ये लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे स्थान अतुलनीय व अद्वितीय आहे. लक्ष्मीबाई यांनी कर्मवीर अण्णांच्या कार्यात मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या यशस्वी जीवन कार्यात, शैक्षणिक वाटचालीत लक्ष्मीबाईंचा अत्यंत मोलाचा वाटा आहे. या रयत माऊलीचे समर्पण आपण कधीही विसरू शकणार नाही. त्यांची पुण्यतिथी नुकतीच साजरी झाली. त्यानिमित्ताने...

लक्ष्मीबाई अत्यंत नम्र, विनयषील, सेवाभावी व त्यागी होत्या. आर्जवी, विनयशील मधुर, आपुलकीदर्शक, सौम्य असे बोलण्याची सवय त्यांना होती, समर्थ म्हणतात...

**'राखावी बहुतांची अंतरे।**
**भाग्य येते तद्नंतरे।।**

कुंडल येथे आण्णांच्या घरी आई-वडील, पत्नी, चुलत भाऊ, दोन बहिणी असा ९-१० लोकांचा परिवार होता. शेजारी व इतर जाती धर्माची कुटुंबे होती. लोकांची सतत ये-जा होती. या सर्वांचे चहा-पान, जेवण-खाण, सणवार लक्ष्मीबाई करत. प्रत्येकाच्या आवडी-निवडी सांभाळत. त्या खूप सोशिक होत्या. त्यांच्या आदर्श वागणुकीचे सर्वजण कौतुक करत असत.

सन १९२४पासून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी साताऱ्यास आपले कार्यक्षेत्र निवडले. अण्णांच्या कार्यात लक्ष्मीबाई एकरूप होऊन गेल्या. अण्णांनी सातारा येथे सोमवार पेठेत घर घेतले. प्रारंभी स्पृष्य-अस्पृष्य मुले त्यांनी स्वत:च्या घरातच ठेवली होती. पुढे अण्णांच्या कार्याचा व्याप वाढला तेव्हा 'धनिणीची बाग' भाड्याने घेतली. तेथे सर्व विद्यार्थ्यांची व्यवस्था करण्यात आली. लक्ष्मीबाई वसतिगृहातील मुलांची देखभाल 'आई' प्रमाणे करीत. मुलांचं दुखलं खुपलं, त्यांचं आजारपण आईच्या मायेनं निस्तरत असत. मुलांसाठी स्वयंपाक, बाजारहाट, आजारपणात औषधोपचार व सेवा या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या. त्यांची निरलस सेवाभावी वृत्ती व पराकोटीचा त्याग अतुलनीय आहे. या तत्त्वांचा मूर्तिमंत आदर्ष त्यांनी घालून दिलेला आहे. सेवा, सहाय्य, सहकार्य, मदत तसेच कष्ट आणि काटकसर या अत्यंत महत्वाच्या गोष्टींचा प्रभाव वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या जीवनावर पडला.



अण्णा संस्थेच्या कामाकरिता बाहेरगावी जात. त्यांचे येणे अनिश्चित असे. अशा वेळी लक्ष्मीबाई वसतिगृहातील सर्व देखरेख पाहत असत. वसतिगृहातील मुलांशी पोटच्या मुलाप्रमाणे त्या एकरूप झाल्या होत्या. एखादा मुलगा खिन्न दिसला की त्यांची घालमेल होत असे. मुलांचे सर्व आटोपून झाले की त्या झोपत. मुलांच्या जेवणानंतर त्या अन्नग्रहण करीत असत.

लक्ष्मीबाईंना शान शौकीची हौस नव्हती. त्यांची राहणी अत्यंत साधी होती. त्यांना माहेरहून नव्वद तोळ्याचे दागिने मिळाले होते. त्यांचे धाकटे बंधू कलगोंडा पाटील यांचे भगिनी प्रेम अलौकिक होते. साताऱ्यास ते नेहमी जात असत. त्यांनी लक्ष्मीबाईंना १२० तोळ्याचे सोन्याचे दागिने दिले होते. अण्णांनी आपली पुंजी यापूर्वीच खर्च केली होती. लक्ष्मीबाई यांनी मंगळसूत्रासह आपले सर्व दागिनेही वसतिगृह खर्चाकरिता दिले होते. त्यांनी शकुंतलेची समजूत काढून तिच्या बांगड्या अण्णांना दिल्या, कारण अण्णा नेहमी पैशाच्या अडचणीत असत. वसतिगृहातील मुलांच्या सेवेत त्यांनी आपले आयुष्य वेचले.

**संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात...**
**जगाच्या सुखोद्देशें। शरीर वाचामानसें।**
**राहाटणें ते अहिंसे। रूप जाण।।**

जगाला सुख मिळावे यासाठी शरीर, वाणी, मनाने तसेच धनाने अखंड झिजणे. सुप्रसिध्द लेखिका डॉ. सुषमा वाटवे (पुणे) यांचे एक प्रसिध्द वाक्य आहे-

Happiness lies in making others happy

सुप्रसिध्द लेखक डॉ. सहदेव चौगुले-शिंदे म्हणतात...

To be happy is a good thing, to see others being happy is a better thing and to make others happy is the best thing in the world.

लक्ष्मीबाईंनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी तन-मन-धन खर्च करून मोलाचे सहाय्य केले आहे. अण्णा म्हणतात, माझ्या अल्पस्वल्प यशाचे श्रेय माझ्या पत्नीच्या अलौकिक त्यागमय सहकार्याला आहे.

उत्तर सातारा जिल्हा लोकल बोर्डाने १९५८ साली कर्मवीर भाऊराव पाटील यांना मानपत्र दिले. या मानपत्रात म्हटले आहे, आपले शिक्षणक्षेत्रातील कार्य अलौकिक आहे. हे कार्य करीत असताना आपण आपले सर्वस्व या कार्याकरिता खर्च केले व आपली धर्मपत्नी कै. लक्ष्मीबाई यांनी याच कार्याकरिता आपला शेवटचा दागिना म्हणजे मंगळसूत्र उपयोगात आणले. धन्य ती माऊली!

अण्णांच्या अनुपस्थितीत लक्ष्मीबाई स्वतः च्या दागिन्यांवर वसतिगृहाचा खर्च चालवीत. मुलांचे आजारपण, अभ्यास, खाणे-पिणे त्या पाहत. त्या सर्वसमावेशक होत्या. सातारा रोडला असताना त्यांना सामाजिक कामाची सवय झाली होती. महात्मा गांधीजींची सर्वधर्मसमभावाची कल्पना व समत्ववृत्ती हा गीतेचा संदेश सातारा रोड येथूनच त्यांच्या जीवनात दिसून येतो. अथक, परिश्रम, असीम त्याग हे त्यांचे अतुलनीय योगदान आहे. त्यांच्या अलौकिक वात्सल्याला तोड नाही. उत्कट संवेदनषील काव्यमय मन, करुणा आणि प्रेम या गुणांनी त्यांचं व्यक्तिमत्व भरलेलं होतं.

३० मार्च १९३० रोजी गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी लक्ष्मीबाई अकाली अनंतात विलीन झाल्या. जगप्रसिद्ध वक्ता तसेच लेखक रॉबीन शर्मा यांनी आपल्या पुस्तकात 'ब्रेव्हार्ट' या चित्रपटाचा उल्लेख केला आहे. चित्रपटाचा नायक मेल ग्रिब्सन म्हणतो, 'आपल्यातला प्रत्येकजण हा कधी ना कधी मरणारच आहे, परंतु आपल्यातले थोडेच लोक हे खऱ्या अर्थाने जगतात.

लक्ष्मीबाई यांच्या त्यागी वृत्तीचा आदर्श महाराष्ट्रातील जुन्या-नव्या पिढ्यांना अनुकरणीय ठरला आहे. अत्यंत नम्र, विनयशील, सेवाभावी व त्यागी वृत्तीच्या माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतलाताई ठाकूर यांनी कोट्यवधी रुपयांची देणगी रयत शिक्षण संस्थेला दिली आहे व त्यागाच्या पूर्वपरंपरेला पुनरुज्जीवन मिळवून दिले आहे.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

**-डॉ. विजयकुमार रणदिवे, पनवेल**

# संगीत नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर

मराठीतील पहिले श्रेष्ठ संगीत नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे संपूर्ण नाव बळवंत पांडुरंग किर्लोस्कर. त्यांचा जन्म ३१ मार्च १८४३ रोजी धारवाड जिल्ह्यात गुर्लहोसूर या गावी झाला. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत कानडी व मराठी भाषेचा अभ्यास त्यांनी घरीच केला. नंतर कोल्हापूर व धारवाड येथे शिक्षणासाठी राहून मुलकी परीक्षेपर्यंत ते शिकले. त्या पुढील शिक्षणासाठी पुण्यास असताना ते नाटक मंडळ्यांना पदे रचून देऊ लागले.



स्वतःची नाटक मंडळी काढून अण्णासाहेबांनी काही नाटकेही केली. तथापि, ही नाटक मंडळी मोडली आणि ते गुर्लहोसूर येथे येऊन राहिले. त्यानंतर त्यांनी वकिलीची परीक्षा देण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी न झाल्यामुळे ते नोकरी करू लागले. शिक्षक, जमादार आणि महसूल आयुक्ताच्या कचेरीतील कर्मचारी अशा विविध प्रकारच्या नोकऱ्या त्यांनी केल्या.

अण्णासाहेबांनी प्रारंभी अल्लाउद्दिनाची चितुडगडावरील स्वारी हे नाटक लिहावयास घेतले होते, पण ते अपुरेच राहिले. शिक्षक असताना शांकरदिग्जय हे गद्य नाटक त्यांनी लिहिले. पुणे येथे १८८० साली एका पारशी नाटक मंडळीचे ऑपेराच्या धर्तीवरील एक नाटक त्यांच्या पाहण्यात आले. तसे नाटक मराठीत करून दाखविण्याची इच्छा त्यांना होऊन त्यांनी कालिदासाच्या अभिज्ञानशाकुंतल या नाटकाचे भाषांतर केले. त्यामध्ये स्वतःची पदेही घातली व उत्तम नटसंच मिळवून ते रंगभूमीवर आणले. या नाटकास लाभलेले अपूर्व यश आणि लोकप्रियता पाहून १८८०मध्ये किर्लोस्कर नाटक मंडळीची त्यांनी स्थापना केली. त्यानंतर सुभद्राहरणावरील संगीत सौभद्र हे नाटक स्वतंत्रपणे त्यांनी लिहिले. अण्णासाहेबांनी काव्यरचनाही बरीच केली. ते मधुमेहाच्या विकाराने गुर्लहोसूर येथेच २ नोव्हेंबर १८८५ रोजी निवर्तले.

(साभार : मराठी विश्वकोष)



## बदलते तंत्रज्ञान

# सावधान! सकाळी उठल्या उठल्या मोबाईल वापरता

सकाळी उठल्याबरोबर स्मार्टफोन वापरण्याच्या सवयीमुळे होऊ शकतात गंभीर आरोग्य समस्या. जाणून घ्या. कशामुळे झोपेची गुणवत्ता खराब होऊ शकते आणि स्ट्रेसवाढू शकतो.



आजकाल स्मार्टफोन आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. त्याने आपल्या जीवनावर इतकं वर्चस्व गाजवलं आहे की, त्याशिवाय आपण आपला दिवस घालवू शकत नाही. आपण दिवसभर काही ना काही कारणाने फोन वापरत असतो, पण सकाळी उठल्याबरोबर स्मार्टफोनच्या स्क्रीनकडे पाहणे तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. सकाळी उठल्या उठल्या स्मार्टफोन वापरण्यामुळे अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकतात, जे थेट आपल्या आरोग्य, मानसिक आरोग्य आणि व्यक्तिमत्त्वावर परिणाम करतात.

**झोपेची गुणवत्ता खराब होईल**

जेव्हा आपण झोपलेले असतो, तेव्हा आपल्या मेंदूला शांतता असते. मात्र, सकाळी जरी आपल्याला फोनची स्क्रीन दिसली तरी, आपला मेंदू अचानक सक्रिय होतो, ज्यामुळे मेंदूच्या नसा प्रभावित होतात. जर ही सवय दीर्घकाळ सुरू राहिली, तर झोपेची गुणवत्ता खराब होऊ शकते किंवा आपल्याला कायम थकलेलेपण जाणवू शकते.

**स्ट्रेस वाढेल**

स्मार्टफोनवर सोशल मीडिया, न्यूज, ईमेल आणि अनेक प्रकारच्या ॲप्सचे नोटिफिकेशन्स येत राहतात. सकाळी उठल्यावर यांना पाहिल्यास स्ट्रेस वाढू शकतो. सकाळी जर नकारात्मक बातम्या पाहिल्या, तर आपला मेंदू नकारात्मकतेने भरलेला राहतो आणि संपूर्ण दिवस आपला मूड खराब राहतो.

**डोळ्यांसंबंधी समस्या**

स्मार्टफोनच्या स्क्रीनमधून निघणारी निळी प्रकाशाची किरण डोळ्यांसाठी अत्यंत हानिकारक असते. सकाळी स्मार्टफोनचा वापर केल्यामुळे डोळ्यात जळजळ, सूज आणि धूसरपणासारख्या समस्याही उद्भवू शकतात.

सकाळी उठल्यावर स्मार्टफोन वापरण्याऐवजी काही अन्य गतिविधींवर लक्ष केंद्रित करायला हवे. आपण सकाळी योग, ध्यान, किंवा व्यायाम करून आपल्या दिवसाची सुरूवात करू शकता. यामुळे आपला मेंदू शांत राहील, झोप चांगली लागेल आणि आपली उत्पादकता देखील सुधारेल.

# भारताच्या पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी

आनंदीबाई गोपाळराव जोशी या वैद्यकशास्त्रातील पहिल्या भारतीय महिला डॉक्टर होत्या. त्यांचा जन्म ३१ मार्च १८६५ रोजी पुणे येथे झाला. आनंदीबाईंचे पूर्वाश्रमीचे नाव यमुना होते. जुन्या कल्याण परिसरातील पारनाका इथे राहणाऱ्या गणपतराव अमृतेश्वर जोशी यांची त्या ज्येष्ठ कन्या. वयाच्या नवव्या वर्षी बालपणातच त्यांचा विवाह वयाने २० वर्षांनी मोठे असणाऱ्या गोपाळराव जोशी यांच्याशी झाला. लग्नानंतर गोपाळरावांनी आपल्या पत्नीचे यमुना हे नाव बदलून आनंदीबाई असे ठेवले. लग्नानंतर आनंदीबाईंनी वयाच्या १४व्या वर्षी एका मुलास जन्म दिला, पण दुर्दैवाने पुरेशी वैद्यकीय सुविधा न मिळाल्याने तो केवळ दहाच दिवस जगू शकला. हीच खंत आनंदीबाईना वैद्यकीय शिक्षणाकडे खेचून घेण्यास कारणीभूत ठरली.

गोपाळराव स्वतः 'लोकहितवादी'ची शतपत्रे वाचत. आपल्या पत्नीतला शिक्षणात रस आहे हे गोपाळरावांनी जाणले होते. लोकहितवादीच्या शतपत्रातून ते प्रेरित झाले आणि आपल्या पत्नीस इंग्रजी शिकविण्याचा निश्चय केला. गोपाळराव पोस्ट ऑफिसात कारकून होते. त्यांची नोकरीनिमित्त बदली होत असे. कोल्हापूर, मुंबई, भुज, कोलकता, बराकपूर, श्रीरामपूर (बंगालमधील) इथे प्रत्येक ठिकाणी गोपाळरावांबरोबर आनंदीबाई जात राहिल्या



## निमित्त

आणि गोपाळराव तिला शिकवित राहिले.

कोल्हापूरमध्ये मिशनऱ्यांशी ओळख वाढल्यावर तिथे प्रथम गोपाळरावांच्या मनात आले की आनंदीला अमेरिकेला पाठवून तिचे शिक्षण करावे. त्या वेळी गोपाळरावांनाही अमेरिकेला जायची इच्छा होती, परंतु ते काही जमू शकले नाही. आनंदी बुद्धिमान असल्याने त्यांनी इंग्रजी भाषा व अन्य विषय पटकन आत्मसात केले. त्यांना अमेरिकेला शिकायला जाण्यासाठी पशांची तरतूद आवश्यक होती. ती करण्यात व जायला सोबत शोधण्यात दोन-चार वर्षे गेली.

स्त्री डॉक्टरची किती गरज आहे हे ओळखून आनंदीबाई डॉक्टरची पदवी घेण्यासाठी अमेरिकेत गेल्या, परंतु प्रत्येक ठिकाणी त्यांना सतत संघर्ष करावा लागला. अठराव्या वर्षी १८८३मध्ये एका अमेरिकी बाईच्या सोबतीने एकटीने दोन महिन्यांचा बोटीने प्रवास केला. त्यात त्या शाकाहारी आणि साडी हाच पोशाख. बोटीवर त्यांची उपासमार झाली. त्या आजारी पडल्या, पण पुढेही चार वर्षे त्यांची उपासमारच झाली. भारतीय पद्धतीचे अन्न मिळाले नाही. परदेशी कपडे वापरायचे नाहीत म्हणून त्या साडी नेसून धाबळीचे जाकीट घालत. त्यामुळे तिथली बर्फाळ थंडी त्यांचे शरीर चिरत राहिली. त्यात अभ्यास, स्वत:चा स्वयंपाक स्वत: करायचा, समाज-नातलग यांनी दिलेली दूषणे सहन करीत इच्छित कार्य करीत त्या राहत असत तिथला समाजही आनंदीशी कुत्सितपणे वागत होता. तिथेही कार्पेटरबाई आणि कॉलेजच्या प्रिन्सिपॉल इत्यादी चांगल्या स्त्रिया भेटल्या, परंतु अन्य बऱ्याच जणांनी आनंदीला त्रास दिला.

जेव्हा आनंदीबाई भारतात परतल्या १६ नोव्हेंबर १८८६ या दिवशी तेव्हा मुंबई बंदरावर लोकांनी गर्दी केली. त्यांचे पुष्पवृष्टीने स्वागत झाले. त्या आजारीच होत्या, परंतु हिंदुस्थानात घरी जायला मिळणार, घरचे अन्न मिळणार म्हणून त्यांची प्रकृती तात्पुरती स्थिर होती, पण एव्हाना त्यांना क्षयाची बाधा झाली होती. अखेर आनंदीबाई जोशी यांचे २६ फेब्रुवारी १८८७ रोजी निधन झाले.

**-संजीव वेलणकर**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# साबण वापरायच्या आधी एक्स्पायरी डेट चेक करा

लेबल्स वाचणे हे केवळ खाण्यायोग्य प्रोडक्ट्ससाठी नाही तर तुम्ही सामान्यतः तुमच्या शरीरावर वापरत असलेल्या प्रोडक्ट्ससाठीदेखील अत्यंत महत्त्वाचे आहे. एक्स्पायरी आणि शेल्फ लाइफमधील फरक तुम्हाला आधीच माहीत असल्याने तुम्ही तुमच्या शरीरावर एक्स्पायरी साबण वापरता तेव्हा काय होते याबद्दल तज्ज्ञांकडून जाणून घेऊया. नाशवंत वस्तूंप्रमाणेच साबण कालांतराने खराब होत नाही, असे तज्ज्ञ म्हणतात. तथापि, त्याची प्रभावीता कमी होऊ शकते. याव्यतिरिक्त ते कसे साठवले जातात आणि वापरले जातात यावरूनदेखील फरक पडू शकतो.



सौंदर्यतज्ज्ञ व कॉस्मेटोलॉजिस्ट डॉ. करुणा मल्होत्रा म्हणाल्या की, कालबाह्य झालेले साबण वापरल्याने त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात. काळाच्या ओघात साबणांची प्रभाविता कमी होऊ शकते, विशेषतः अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आणि घटकांचे विघटन झाल्यामुळे पीएच पातळी बदलू शकते. डॉ. मल्होत्रा यांनी पुढे सांगितले, यामुळे त्वचेवर जळजळ, कोरडेपणा किंवा लर्जिक रिक्शन होऊ शकते. विशेषतः संवेदनशील त्वचेसाठी. शिवाय कालबाह्य प्रोडक्ट्समध्ये बॅक्टेरिया किंवा बुरशीची वाढ होऊ शकते, ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो.

साबण जर योग्यरित्या साठवला गेला तर त्याचा बार त्याच्या मुदतीनंतरही प्रभावी राहू शकतो. तथापि, कालांतराने त्याचा सुगंध कमी होऊ शकतो.

तुमच्या साबणाच्या बारची मुदत संपली आहे की नाही हे ठरवण्यासाठी डॉ. मल्होत्रा म्हणाले की, तुम्ही रंग फिकट होणे आणि सुगंध कमी होणे यांसारख्या लक्षणांकडे लक्ष द्यावे. जर तुमच्या साबणाच्या बारमध्ये बुरशीची लक्षणे दिसली तर तो साबण टाकून देणे चांगले.

जोखीम कमी करण्यासाठी डॉ. मल्होत्रा यांनी त्वचेचे आरोग्य राखण्यासाठी सौम्य, सुगंध नसलेले साबण वापरण्याची आणि कालबाह्य झालेले प्रोडक्ट्स टाकून देण्याची शिफारस केली.

डॉ. मल्होत्रा म्हणाले की, बुरशीजन्य संसर्ग किंवा कोरडेपणा यासारख्या त्वचेच्या आजारांना बळी पडणाऱ्या व्यक्तींसाठी, जुनी किंवा खराब झालेले प्रोडक्ट्स टाळणे अधिक महत्त्वाचे बनते.

साबण योग्यरित्या साठवल्याने त्याचे आयुष्य वाढू शकते. डॉ. मल्होत्रा यांनी तो कमी आर्द्रतेच्या ठिकाणी ठेवण्याचा सल्ला दिला, ज्यामुळे बुरशीची वाढ रोखण्यास मदत होते.

# रायगड जिल्ह्यातील धरण क्षेत्रात ४३.९९ टक्के पाणीसाठा उपलब्ध

**रोहे : प्रतिनिधी**

उन्हाळा चालू झाला असून उन्हाच्या झळा लागत असल्याने त्याचा परिणाम रायगड जिल्ह्यातील धरण क्षेत्रातील पाणीसाठावर होताना दिसत आहे. जिल्ह्यातील पाणीसाठा कमी होताना दिसत आहे. रायगड जिल्ह्यातील रायगड पाटबंधारे विभाग कोलाड अंतर्गत येत असलेल्या जिल्ह्यातील २८ धरणक्षेत्रात सरासरी ४३.९९ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. वेगाने जिल्ह्यातील धरणक्षेत्रातील पाणीसाठा उन्हाळा वाढत असल्याने कमी होताना दिसत असून अजूनही पाऊस चालू होण्यास किमान अडीच महिने शिल्लक आहेत.



रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रापैकी १६ धरणक्षेत्रात ५० टक्के पेक्षा कमी पाणीसाठी उपलब्ध आहे. रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील आंबेघर धरण क्षेत्रात सर्वात जास्त ७८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तर श्रीवर्धन तालुक्यातील रानीवली धरण क्षेत्रात सर्वात कमी १२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ धरणक्षेत्रातील पाणीसाठा पाहता मुरूड तालुक्यातील फणसाड धरणक्षेत्रात ४४ टक्के पाणीसाठा उपलब्ध, तळा तालुक्यातील ६५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरणक्षेत्रात ६५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, पेण तालुक्यातील आंबेघर धरणक्षेत्रात ७८ टक्के पाणीसाठा, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरणक्षेत्रात ३३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरणक्षेत्रात ३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, घोटवडे धरणक्षेत्रात २५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, ढोकशेत धरणक्षेत्रात १३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कवेळे धरणक्षेत्रात ३१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उन्हेरे धरणक्षेत्रात २३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणक्षेत्रात ५० टक्के पाणीसाठा उपलब्ध, कुडकी धरणक्षेत्रात ४६ टक्के पाणीसाठा उपलब्ध, रानीवली धरणक्षेत्रात १२ टक्के पाणीसाठा उपलब्ध, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरणक्षेत्रात ५९ टक्के पाणीसाठा उपलब्ध, संदेरी धरणक्षेत्रात ५८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, महाड तालुक्यातील वरंध धरणक्षेत्रात ३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खिंडवाडी धरणक्षेत्रात ३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कोथुर्डे धरणक्षेत्रात २१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खैरे धरणक्षेत्रात ३६ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कर्जत तालुक्यातील साळोख धरणक्षेत्रात ३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, अवसरे धरणक्षेत्रात ५७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खालापूर तालुक्यातील भिलवले धरणक्षेत्रात ६४ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कलोते मोकाशी धरणक्षेत्रात ३२ टक्के पाणीसाठा उपलब्ध, डोणवत धरणक्षेत्रात ४२ टक्के पाणीसाठा उपलब्ध, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणक्षेत्रात ५९ टक्के पाणीसाठा उपलब्ध, बामणोली धरणक्षेत्रात ६१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उसरण धरणक्षेत्रात ५८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उरण तालुक्यातील पुनाडे धरणक्षेत्रात ५८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

# पोलादपूर नगरपंचायतीतर्फे दिव्यांग बांधवांना अनुदान वाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर नगरपंचायत तर्फे २०२४- २५ आर्थिक वर्षातील दिव्यांग बांधवांचे धनादेश वाटप करण्यात आले. या वेळी पोलादपूर नगरपंचायतीचे प्रभारी नगराध्यक्ष प्रसाद इंगवले, माजी नगराध्यक्षा सोनाली गायकवाड, शहर प्रमुख तथा माजी नगरसेवक सुरेश पवार, महिला बालकल्याण सभापती सुनीता पार्टे, नगरसेविका अस्मिता पवार, स्नेहा मेहता, शिल्पा दरेकर तसेच लेखापाल प्रशांत पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सुमारे पन्नासहून अधिक दिव्यांग बांधवांना प्रत्येकी चार हजार रुपये रकमेचा धनादेश देण्यात आला.



या वेळी दिव्यांग बांधव संघटनेच्या अध्यक्षा आलिया धामणकर तसेच ज्येष्ठ समाजसेवक मंगेश नगरकर, मोहम्मद मुजावर अन्य दिव्यांग बांधव उपस्थित होते. मंगेश नगरकर तसेच अध्यक्षा आलिया धामणकर यांनी मत मांडले.

नगराध्यक्ष प्रसाद इंगवले यांनी, उपनगराध्यक्ष तसेच प्रभारी नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळातील हा पहिलाच कार्यक्रम असून दिव्यांग बांधवांसोबत संवाद साधायला मिळाल्आयाने आनंद होत आहे. दिव्यांगाचे आयुष्यात खडतर असून दिव्यांग अवस्थेवर खऱ्याअर्थाने मात करतात आणि अशा परिस्थितीमध्ये आपण समाज प्रतिनिधी या नात्याने पूर्णपणे यांच्या पाठीशी राहणार आहोत.

आगामी काळामध्ये मंत्री ना.भरत गोगावले यांच्या माध्यमातून शासनाच्या योजनांचा लाभ दिव्यांग बांधवांपर्यंत मिळवून देण्याकरिता आम्ही सर्व नगरसेवक प्रयत्न करू, अशी ग्वाही दिली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशासकीय अधिकारी रूपेश जाधव यांनी केले.

## निवडक

### स्वामी समर्थांचा प्रकट दिन सोहळा

**माणगाव :** येथे श्री स्वामी समर्थ महाराज यांचा प्रकटदीन सोहळा सोमवारी (दि.३१) मठात साईनगर पूर्व, कालवा रोड माणगाव याठिकाणी साजरी करण्यात येणार आहे. यादिवशी श्री सत्यदत्त पूजा, दुपारी १२ वा.महाआरती, महाप्रसाद, नामस्मरण, सायंकाळी ७:३० वा.महाआरती, महाप्रसाद, रात्री ९ वा.सुश्राव्य भजन असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सर्व भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव, श्री स्वामी समर्थ उत्सव कमिटी माणगाव, श्री स्वामी समर्थ सेवेकरी माणगाव यांनी केले आहे.

### दिव येथे श्रीराम जन्मोत्सव

**पेण :** तालुक्यातील दिव येथे श्रीनागेश्वर देवस्थान म्हात्रे भाऊबंद मंडळ दिव यांचे ३० मार्च ते ६ एप्रिल २०२४ पर्यंत श्रीराम जन्मोत्सव सोहळा साजरा होणार आहे. रविवार ३० मार्च रोजी सकाळी अभिषेक त्यानंतर श्रींची आरती, दररोज संध्याकाळी ५ वाजता ह.भ.प. कुणाल ठाकूर, ह.भ.प. शर्मिला ठाकूर, ह.भ.प. लक्ष्मण विठ्ठल म्हात्रे, वढाव यांचा काळभैरव हरीपाठ मंडळ दिव चा दररोज संध्याकाळी ६ वाजता हरीपाठ होईल. नागेश्वर देवस्यान दिव ता.पेण व बहिरीदेव देवस्थान वढाव-पेण यांची संयुक्त यात्रा गुरुवार १० एप्रिल २०२४ रोजी भरेल.

### नम्रता पानसरे यांचे यश

**रोहे :** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन आयोजित शिक्षकांसाठी राज्यस्तरीय दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा सन २०२३ मध्ये घेण्यात आल्या. स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ २८ एप्रिल रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल जिल्हा रायगड यांनी आयोजन करून जिल्हास्तर व तालुकास्तरावरील गुणवंत शिक्षकांचा गुणगौरव समारंभ घेण्यात आला. सदर स्पर्धे त नम्रता नारायण पानसरे रोहा नगरपरिषद प . पू . पांडुरंग शास्त्री आठवले अष्टमी मराठी शाळा क्र ३ यांना तालुकास्तरावर प्रथम क्रमांक व जिल्हा स्तरावर व्हिडिओ निर्मितीमध्ये तृतीय क्रमांक मिळाला आहे.



# अष्टमी येथे इफ्तार पार्टी उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

रोहे शहरातील अष्टमी गावात पवित्र रमाजन महिन्याच्या अनुषंगाने येथील नव तरुण मंडळाच्या वतीने आयोजित इफ्तार पार्टी मोठ्या उत्साहात झाली.

दरवर्षाप्रमाणे यंदाही अष्टमी नवतरुण मित्र मंडळाच्यावतीने नातेकर चौक येथे रमजान निमित्ताने शुक्रवारी सायंकाळी ६:४५ वा.इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. रोजा इफ्तार पूर्वी मौलाना समीउल्लहा जंजीरकर यांनी सर्वांना सुख, शांती, दया लाभो अशी प्रार्थना केली. तर बांग होताच रोजा इफ्तार करण्यात आला.



या वेळी अष्टमी मुस्लिम समाज अध्यक्ष शफी पानसरी, उपाध्यक्ष मन्सूर नाडकर, मुबीन दळवी, सचिव राहील नगोठकर, खजिनदार अफसर करजिकर,रशीद डबीर, इरफान दर्जी, माजी अध्यक्ष बाकर साष्टीकर, जमीर करजिकर, मुशीर दर्जी, इम्तियाज दर्जी, रियाज शेटे, जुबेर चौगले, मौला शेख, अजीज महाडकर, वसीम सावरटकर, आदिब येरुणकर, बिलाल मोरबेकर,मन्सूर कचकोल, मजीद पठाण, यासिन पानसरी, सलीम दर्जी, रिदवान दर्जी आदी रोहा अष्टमी विभागातील मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# आज रमजान ईद सर्वत्र होणार साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

रमजान ईद सोमवारी (दि.३१) सर्वत्र साजरी होणार आहे.

इस्लामी शाबान महिन्यानंतर पवित्र रमजान महिन्याला प्रारंभ होतो. यावर्षी १ मार्च रोजी चंद्रदर्शन झाल्यावर रमजान महिन्याला सुरुवात झाली. या महिन्यात मुस्लिम बांधव रोजे (उपवास) धरीत असतात तसेच नमाज पठण व कुराण वाचनावर तसेच जकात देणे. (दानधर्म करणे) यावर मुस्लिम बांधवांचा जास्त भर असतो. या महिन्यात रात्रीची इशाची नमाज झाल्यावर तरविहची विशेष नमाज मुस्लिम बांधव अदा करतात. त्यानंतर मशीद व ईदगाहमध्ये मुस्लिम बांधव उपस्थित राहून ईदची सामुदायिक नमाज अदा करतील.

३१ मार्च रोजी रमजानची ईद साजरी केली जाणार आहे. या रमजान ईदची सामुदायिक नमाज सोमवारी माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील जामा मशिदीत सकाळी ८.३० वाजता होणार असल्याची माहिती येथील मस्जिद मोहल्ल्याचे अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजीते यांनी दिली.

# गुढीपाडव्याचा पारंपरिक साज

**खोपोली : प्रतिनिधी**

चैत्रपाडवा, हिंदू नववर्ष व गुडीपाडवा निमित्ताने खोपोलीत मोठ्या संख्येने सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी घरोघरी आनंदाची गुढी उभारून गुढीपाडवा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. विविध मंडळे, सामाजिक संस्थाकडून गुडीपाडवा व नववर्षाच्या निमित्ताने सार्वजनिक महापूजा, सत्यनारायण पूजा सह भजन, कीर्तन व अन्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. व्यापारी वर्ग, बांधकाम व्यावसायिक, इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रिक, कपड्याचे बडे व्यवसाहिक व दुकानदारांनी गुडीपाडवा निमित्ताने ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी खास



सूट मोहीम राबवली, तर शहरात गुडीपाडवा निमित्ताने विविध क्षेत्रातील नवीन व्यवसायांचे ही उद्घाटन करण्यात आले.

शहरातील सामाजिक सलोखा व शहराची बंधुभावाची परंपरा कायम ठेवत याही वर्षी गुडीपाडवा निमित्ताने अन्य धर्मियांनी ही हिंदू कुटूंबियांना व मित्रांना शुभेच्छा देत एकत्रितपणे गुडीपाडवा सण साजरा केला.

# वळके शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ठाणे येथील आरोग्य व शैक्षणिक क्षेत्रात सामाजिक बांधिलकीने काम करणारा आनंदी फांउडेशनच्या स्तुत्य उपक्रमाने मुरूड तालुक्यातील वळके राजिप शाळेतील विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.




आनंदी फाउडेशनचे विश्वस्त अशोक राजाराम तावडे व आदिती तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत वळके राजिप शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी वळके ग्रा.प. सरपंच प्रिया हर्षद म्हात्रे यांच्यासह पदवीधर शिक्षक रमेश मनोहर भगत, शिक्षिका अर्पणा अशोक ठाकूर, शिक्षक शिवम विश्वास शिवणकर, शिक्षीका पुजा पालकर तसेच राजिप शाळा वळके विदयार्थी वर्ग यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविकेत पदवीधर शिक्षक रमेश भगत यांनी आनंदी फांउडेशन व विश्वस्त अशोक तावडे व आदिती तावडे यांच्या सामाजीक कार्याबद्दलची माहिती उपस्थित मान्यवर व विदयार्थीवर्ग यांना सांगून त्या अनुषंगाने शैक्षणिक क्षेत्रातील स्तुत्य उपक्रमाने वळके राजिप शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम होत असल्याची माहिती दिली.

कार्यक्रमास सहकार्य दिलयाबद्दल आनंदी फांउडेशनच्या वतीने अशोक तावडे व आदिती तावडे यांचे हस्ते वळके ग्रा.प.सरपंच प्रिया म्हात्रे, पदवीधर शिक्षक रमेश भगत, शिक्षीका अर्पणा ठाकूर, शिक्षक शिवम शिवणकर, शिक्षीका पुजा पालकर आदीचे स्वागत सत्कार शाल, श्रीफळ व पुष्पगूच्छ प्रदान करून केले. त्यानंतर राजिप शाळा विदयार्थ्याना आनंदी फांउडेशनच्या वतीने अशोक तावडे, आदिती तावडे, सरपंच प्रिया म्हात्रे, शिक्षक रमेश भगत, अर्पणा ठाकूर यांचे हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

# समाज घडवणाऱ्या शिक्षकांचा सन्मान झालाच पाहिजे -आमदार महेंद्र दळवी

**मुरुड : प्रतिनिधी**

सर्व क्षेत्रात प्रावीण्य पूर्ण विद्यार्थी घडवण्याचे काम शिक्षक वृंद करीत असतात त्यामुळे समाज घडवणाऱ्या शिक्षकांचा सन्मान सर्वच क्षेत्रात झाला पाहिजे असे महत्वपूर्ण प्रतिपादन अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी केले आहे.

बोर्ली बीट विस्तार अधिकारी नरेंद्र गुरव यांच्या सेवानिवृत्ती समारंभात व्यासपीठावरुन बोलताना त्यांनी वरील विधान केले. नियत वयोमानानुसार गुरव यांचा सेवानिवृत्ती सोहळा मांडला येथील भव्य सभागृहात संपन्न झाला. रायगड जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी अलिबागचे पॅनेल प्रमुख, माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक; शिक्षण परिषद या राज्यातील महत्त्वाच्या संघटनेचे कोकण विभागीय शिक्षक नेते; कनकेश्वर देवस्थानचे मुख्य विश्वस्त अशा नानाविध भूमिकांनी ते रायगड जिल्ह्याला सुपरिचित आहेत.

या वेळी प्रमुख उपस्थितांमध्ये अलिबाग मुरुडचे आमदार महेंद्रशेठ दळवी, मुरूडचे गटविकास अधिकारी राजेंद्र खताळ, गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, स्वीय सहायक संजिवनी नाईक, भगीरथ पाटील, महेश कवळे, दीनेश म्, नितीश पाटील,नितीन पाटील, जयवंत पाटील, संजय पोईलकर, भास्कर साळावकर, देवानंद गोगर, विकास पाटील, विजय गुरव, सुनील माळवी, निलेश वारगे, रवींद्र साळुंखे, संतोष पालकर, जगदीश चोरघे, अपेक्षा म्हात्रे, बाळकृष्ण दरणे यांच्यासह तालुक्यातील पावणेदोनशेहून अधिक शिक्षक, कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन जगदीश चवरकर, राजेंद्र नाईक आभार शरद पाटील यांनी मानले.



# अजित पाशिलकर यांना पुरस्कार

**धाटाव : प्रतिनिधी**

अतिशय संवेदनशील, तरल व भावूक प्रतिमेचा परिसस्पर्श लाभलेले कवी अजित पाशिलकर यांच्या राष्ट्रीय सुरक्षा विषयावर कवितेला पुरस्कार प्राप्त झाला आहे. रोहा एमआयडीसीत राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह निमित्ताने आयोजित स्पर्धेत राठी डाय केम प्रा. लि. कंपनीकडून पाशिलकर यांनी भाग घेतला होता.



प्रतिभावंत कवी अजित पाशिलकर यांना सलग २५ वर्ष विजेता होण्याचा बहुमान मिळाला आहे. या स्पर्धेत पाशिलकर यांच्या साहित्य आणि कवितांमुळे राठी डाय केम प्रा. लि. कंपनीचा दबदबा पहायला मिळतो.

कोकण मराठी साहित्य परिषदेचे सदस्य असलेले अजित पाशिलकर यांच्या अनेक विषयांवर कविता प्रसिद्ध आहेत. कोल्हापूर मंचा तर्फे आकाशवाणीवर प्रस्तुत होणाऱ्या त्यांच्या कविता आणि राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांमुळे पाशिलकर यांना प्रसिद्धी मिळाली. यावर्षीचा राज्यस्तरीय शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार पाशिलकर यांना नुकताच जाहीर झाला असून राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह निमित्ताने आयोजित स्पर्धेत मिळालेल्या यशामुळे पाशिलकर यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# कर्जतमध्ये आरोग्याचा महायज्ञ

**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे यांच्या वाढदिवसानिमित्त 'आरोग्याचा महायज्ञ' या उपक्रमाअंतर्गत आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन आणि रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील विविध ठिकाणी मोफत महा आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ रुग्णांनी घेतला.



या उपक्रमांतर्गत ग्रामीण रुग्णालय, कशेळे येथे भव्य आरोग्य शिबिर झाले. या शिबिराचे उद्घाटन तालुका संपर्कप्रमुख दिलीप ताम्हणे, तालुका समन्वयक रमेश मते, उपतालुका प्रमुख रामचंद्र मिनमीने, उपतालुका संपर्कप्रमुख संदेश सावंत, पाथरज जिल्हा परिषद प्रमुख पंढरीनाथ आगज, पाथरज पंचायत समिती प्रमुख अनिल शेमटे, कशेळे पंचायत समिती भानुदास धुले, जितेंद्र घाडगे, युवासेना तालुकाप्रमुख विलास मोडक, ज्ञानेश्वर करडे, रुपेश हरपुडे, किशोर लष्करे, सागर गायकवाड, जयेश मोहिते, जयेश मते, ज्ञानेश्वर हरपुडे, नवनित कदम आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या शिबिरात कर्जत तालुका वैद्यकीय कक्षातील रोशन साळुंखे, अक्षय शिंगटे, संजय चवरे यांनी सहभाग घेतला. तसेच रायगड हॉस्पिटलचे सीईओ कुशाग्र पटेल, कशेळे प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. झेंडे, आंबिवली पीएससीचे डॉ. रुपेश सोनवणे आणि रायगड हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी नागरिकांची तपासणी करून आवश्यक उपचार व मार्गदर्शन केले. या शेवटच्या आरोग्य शिबिरात २८० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# वृक्षांना इजा करणाऱ्यांवर कारवाई

## ■ झाडांवर खिळे ठोकणाऱ्या व्यक्ती, संस्था व व्यावसायिकांना दंड

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई महापालिका क्षेत्रात वृक्षांवर खिळे ठोकून जाहिराती करण्यात येत असल्याचे तसेच काही वृक्षांवर विद्युत रोषणाई करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. वृक्षांवर खिळे ठोकणे व विद्युत रोषणाई यामुळे वृक्षांना धोका निर्माण होत असून नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील वृक्षराजीवर परिणाम होऊन पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका वृक्ष प्राधिकरणाच्या वतीने २७ जानेवारी २०२५ रोजीचा ठराव क्र.७४६१ अन्वये वृक्षांवर खिळे ठोकणे, विद्युत रोषणाई करणे व वृक्षास इजा पोहचविणाऱ्या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक यांचेवर दंडात्मक कारवाई करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार अशा नागरिक /संस्था/ व्यावसायिक यांचेकडून प्रतिवृक्ष रुपये १० हजार - इतका दंड आकारणेबाबत सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी यांचेमार्फत कारवाई करण्यात येणार आहे.

अशा प्रकारच्या कारवाईमुळे वृक्षांवर खिळे ठोकणे व विद्युत रोषणाई करून पर्यावरणास बाधक ठरणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध होईल तसेच नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील वृक्षांचे व पर्यावरणाचे रक्षण होईल. नागरिकांनी नवी मुंबई शहराच्या पर्यावरण रक्षण व संवर्धनासाठी संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# नवी मुंबई पालिकेत ६२० पदांकरिता भरती सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवर 'गट-क' आणि 'गट - ड' मध्ये ३० संवर्गात ६२० पदांकरिता सरळसेवेव्दारे भरती प्रक्रिया सुरू झाली असून याबाबतची माहिती वर्तमानपत्रांतून तसेच महानगरपालिकेची वेबसाईट व सर्व सोशल मिडिया माध्यमांतून प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मागील आठवड्यात महानगरपालिकेचे बोधचिन्ह असलेले खोटे लेटरहेड व खोटा शिक्का वापरून काहीजणांना नियुक्तीपत्र दिली असल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस विभागाकडे रितसर तक्रार दाखल करून अशा प्रकारच्या दिशाभूल करणा-या माहितीला बळी पडू नये असे आवाहन वर्तमानपत्रांतून करण्यात आले होते.

आता नवी मुंबई महापालिकेत ६२० पदांकरिता भरती प्रक्रिया सुरू झाल्याची रितसर जाहीरात वर्तमानपत्रे व इतर माध्यमांतून प्रसिध्द झाल्यानंतरही काही व्यक्ती मागील आठवड्यातील सदर बातमीचा मजकूर सोशल माध्यमांद्वारे फिरवून ही भरती सुरू नसल्याची चुकीची माहिती प्रसारित करीत आहेत.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने जाहीर करण्यात येत आहे की, नवी मुंबई महापालिकेमध्ये ३० संवर्गातील ६२० पदांकरिता रितसर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून अर्ज दाखल करण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुरू झालेली आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी नवी मुंबई महानगरपालिकेची अधिकृत वेबसाईट https://www.nmmc.gov.in यावर तसेच महापालिकेच्या अधिकृत फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम पेजला भेट द्यावी व याविषयीची अधिकृत माहिती जाणून घ्यावी व अर्ज करावेत, असे आवाहन नमुंमपा प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# रयत माऊलींच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थिनींना पौष्टिक आहार वाटप



**सातारा : रामप्रहर वृत्त**

रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील तथा वहिनी यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील विद्यार्थीनी वसतिगृहातील विद्यार्थिनींना पौष्टिक आहार वाटप करण्यात आले.

या सप्ताहाचे उद्‌घाटन करताना रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन माजी सनदी अधिकारी चंद्रकांत दळवी, सचिव माजी सनदी अधिकारी विकास देशमुख, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब, विद्यार्थीनी वसतिगृह प्रमुख प्रो. डॉ. सविता मेनकुदळे मॅडम, उप प्राचार्य प्रो.डॉ.अनिलकुमार बावरे, उपप्राचार्य प्रो. डॉ. सुभाष वाघमारे, डॉ.संदीप किर्दत, रेक्टर सौ. जुई ढवळे आदी उपस्थित होते.



**पनवेल : वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रेल्वे सुरक्षा कमिटीची बैठक शनिवारी झाली. या वेळी उपनिरीक्षक जगताप, महिला पोलीस हवालदार महाले, हवालदार झाकीर शेख, पोलीस ठाण्यातील महिला अंमलदार तसेच माजी नगरसेविका दर्शना भोईर, सपना पाटील, जरीना शेख, शैला आंबेकर, कविता पाटील आदी उपस्थित होते.**

# रसायनीत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील चांभार्ली-रीस येथील कृष्ण मंदिरात, रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा, शंकरा आय इन्स्टिट्यूट व ग्रामपंचायत मोहोपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर यशस्वीरित्या झाले.

शिबिरामध्ये एकूण ६१ रुग्णांची तपासणी करण्यात आली, यातील ११ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा त्रास असल्याचे दिसून आले. त्यांना शस्त्रक्रीयेसाठी पाठवण्यात आले. आतापर्यंत जवळ जवळ ७०० गरजवंतांनी या मोफत शिबिराचा लाभ घेतला व अंदाजे २०० जणांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली.

या शिबिरासाठी शंकरा आय इन्स्टिट्यूटच्या वैद्यकीय चमूने महत्त्वाची भूमिका बजावली. याशिवाय रोटरी क्लबचे अध्यक्ष सचिन थोरात, प्रोजेक्ट डायरेक्टर गणेश काळे, शशिकांत शानभाग, अमित शहा यांनी या उपक्रमात मोलाची साथ दिली.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गणेश काळे व सरपंच उमात मुंढे यांचे विशेष सहकार्य लाभले. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना दृष्टीदान मिळवून देण्याचा व रसायनी परिसर मोतीबिंदूमुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा व शंकरा आय इन्स्टिट्यूट यांच्या पुढाकाराने सामाजिक आरोग्यसेवा अधिक बळकट होत आहे.

# महात्मा फुले महाविद्यालयात रयत माऊलींची पुण्यतिथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेचे पनवेलमधील महात्मा फुले महाविद्यालयात २९ मार्च रोजी रयत माउली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील पुण्यतिथी कार्यक्रम झाला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गणेश ठाकुर व प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य डॉ. अशोक आढाव होते. कार्यक्रमासाठी काढलेली रांगोळी, रयतगीत व महाराष्ट्र गीत हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण होते. तसेच या कार्यक्रमाच्या भित्तिपत्रिकांचे अनावरण प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, माजी उपप्राचार्य डॉ. अशोक आढाव, उपप्राचार्य डॉ. आर पाटील तसेच इतर महिला सहकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

प्राध्यापक प्रवीण गायकर यांनी प्रस्ताविकपर भाषणात 'पति रायतेचा वाली' सरस्वतिला भेटायला लक्ष्मी धावली अश्या शब्दांमध्ये वर्णन केले या कार्यक्रमात महिला विकास कक्षांतर्गत 'तेजस्विनी' अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्राचार्यानी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याची ताकद म्हणजे लक्ष्मीबाई होत्या तसेच त्यागमुर्ती लक्ष्मीबाईंच्या मदतीने रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष बहरला असे सांगितले. त्यांचे कार्य श्रध्येय नसून अनुकरणीय आहे असेही त्यानी सांगितले.

उपप्राचार्य डॉ. आर. ए. पाटिल यांनी आभार मानले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ. प्रफुल्ल वशेनिकर, डॉ. उलवेकर व प्राध्यापिका शरयु नाईक यानी केले. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला.

# मराठी चेंबर ऑफ कॉमर्सची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कामोठे जवाहर इंडस्ट्रीजमध्ये मराठी चेंबर ऑफ कॉमर्सच्या पनवेल शाखेच्या स्थापनेसंदर्भात बुधवारी (दि.२६) चर्चा झाली.



या बैठकीला जवळपास ३० उद्योजक उपस्थित होते. लवकरच पनवेल कामोठे येथे मराठी चेंबर ऑफ कॉमर्सची नवीन शाखा सुरू होईल. या परिसरात राहणाऱ्या मराठी उद्योजकांनी आणि चेंबरच्या सदस्यांनी या शाखेत सहभागी व्हावे, अशी विनंती करण्यात आली आहे. या बैठकीत खालील मुद्द्यांवर चर्चा झाली.

मराठी चेंबर ऑफ कॉमर्सच्या पनवेल शाखेच्या स्थापनेची खालील उद्दिष्टे आहेत. यात येणाऱ्या काळात पनवेल महत्त्वाचे ठरणार आहे, कारण न्हावा शेवा (३५ km) आणि वाढवण बंदर (१४५ km) अत्यंत योग्य अंतरावर असणार आहे.

चेंबरच्या आगामी कार्यक्रमांची योजनाची माहिती देण्यात आली. मराठी चेंबर ऑफ कॉमर्सची पनवेल शाखा सुरू झाल्याने स्थानिक मराठी उद्योजकांना मोठा फायदा होईल, अशी अपेक्षा आहे.

ही शाखा स्थापने करता कार्यकारणी सदस्य विजय राणे यांनी विशेष मेहनत घेतली आहे. या वेळी स्वप्नील राणे, संघटन कार्यवह. विजय राणे, कार्यकारणी सदस्य, रमेश (बाळकृष्ण) तेरडे, चेअरमन जवाहर इंडस्ट्री (कळंबोली), स्वप्नील गुप्ते व्हाइस चेअरमन, जवाहर इंडस्ट्री (कळंबोली), नंदन पाटील तसेच परिणीता फाऊंडेशनचे साक्षी सागवेकर, प्रशांत सागवेकर, आणि प्रमुख आयोजक तथा सोशल मीडिया प्रमुख प्रसाद हनुमंते यांच्यासह इंडस्ट्रीमधील प्रमुख पदाधिकारी, व्यावसायिक उपस्थित होते.



# 'अल्काईल'कडून वासांबे ग्रा.पं.ला ५०० रोपांचे वाटप

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

अल्काईल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड, पाताळगंगा यांच्या सौजन्याने सीएसआर निधीतून ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांना शनिवारी (दि.२९) माझी वसुंधरा ५.० या महत्त्वपूर्ण अभियानासाठी ५०० रोपांचे वाटप करण्यात आले. आंबा, कडुलिंब, वाळा, बांबू आणि शेवगा अशा विविध रोपांचे या प्रसंगी वाटप करण्यात आले.

या वेळी सरपंच उमा मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील आणि त्यांचे सर्व सहकारी तसेच अल्काईल अमाईन्सचे अधिकारी संदीप पाटील आणि सी एस आर कन्सल्टंट रवी ओंकार हजर होते. अल्काईल अमाइन्सच्या या उपक्रमाबद्दल उमाताई मुंढे यांनी आभार मानले. याव`ळी अल्काईल अमाइन्स तर्फे माझी वसुंधरा ५.० या उपक्रमासाठी वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीला शुभेच्छा देण्यात आल्या.

# नवी मुंबईत रंगले वासंतिक कविसंमेलन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ नवी मुंबई या संस्थेच्या वतीने ज्येष्ठ नागरिक भवन येथे शुक्रवारी (दि.२८) वासंतिक कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी नवी मुंबईचे लोकप्रिय कवी जितेंद्र लाड हे होते. या कविसंमेलनात ३५ कवींनी आपल्या कविता सादर केल्या.

दीपप्रज्वलन करून स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नवरंगचे अध्यक्ष गज आनन म्हात्रे यांनी प्रास्ताविकात आज समाजात कवींची संख्या खुप वाढली म्हणून चिंता करू नये. साहित्यिक दृष्टीने ती चांगली गोष्ट आहे असे प्रतिपादन केले. या कविसंमेलनात जुने आणि युवा कवी यांनी सहभाग घेतला होता. प्रमुख पाहुणे म्हणून रिझर्व्ह बँकेचे निवृत्त प्रबंधक विकास साठे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जितेंद्र लाड यांनी कविता गाऊन कविसंमेलनात सप्तरंग भरले. नवरंगच्या सभासद कल्पना मुनघाटे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यवाह घनश्याम परकाले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास नवी मुंबई, ठाणे, मुंबई, पनवेल परिसरातील काव्यप्रेमी सहभागी झाले होते. या कार्यक्रमास नेरूळ ज्येष्ठ नागरिक सार्वजनिक ग्रंथालयाने मोलाचे सहकार्य केले.

# नवी मुंबई महापालिकेचा दोन स्कॉच पुरस्कारांनी राष्ट्रीय स्तरावर सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**




महानगरपालिकेची 'कार्यक्षम व शाश्वत जलव्यवस्थापन प्रणाली' आणि 'कॅन्सर विषयक काळजी घेणारी कार्यप्रणाली' अशा दोन्ही प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल नवी मुंबई महानगरपालिकेस देशातील प्रतिष्ठित 'स्कॉच ' पुरस्काराने नवी दिल्ली येथील 'स्कॉच समीट'च्या १०० व्या विशेष समारंभात सन्मानीत करण्यात आले.

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाचे सचिव अजय सेठ व स्कॉच समुहाचे अध्यक्ष समीर कोच्छर यांच्या प्रमुख उपस्थितीत, स्कॉच समुहाचे संचालक डॉ.दीपक फाटक व उपाध्यक्ष डॉ.गुरशरण धंजल यांच्या हस्ते हे 'राष्ट्रीय मानाचे दोन स्कॉच' पुरस्कार स्विकारले.

अशाप्रकारे एकाच वेळी महानगरपालिकेच्या २ उल्लेखनीय प्रकल्पांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने नावाजले जाणे ही नवी मुंबईकरांसाठी अभिमानाची गोष्ट असून त्याबद्दल आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सर्व नागरिकांचे अभिनंदन केले आहे. या वेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे उपस्थित होते.

# 'विद्युत खांब हटविण्याची जबाबदारी एमएमआरडीएची'

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याण ते शिळफाटा मार्गावरील कटाई नाक्यापर्यंतच्या सुमारे १० किलोमीटर दरम्यान मेट्रो आणि अनुषंगिक कामांमुळे वाहतुकीला अडथळा ठरणारे विजेचे खांब व वाहिन्या स्थलांतरित करण्याची जबाबदारी एमएमआरडीएची (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) आहे.

काम करतांना विजेचे खांब स्थलांतरित करण्यासाठी एमएमआरडीएने दिलेला प्रस्ताव १.३ टक्के डीडीएफ योजनेतून मंजूर करून महावितरणने एप्रिल-२०२४ मध्येच एमएमआरडीएला दिला आहे. त्यानुसार एमएमआरडीएने कंत्राटदाराची नियुक्ती करुन काम करणे आवश्यक होते व यासंदर्भात महावितरणने सातत्याने पाठपुरावा केल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली आहे.



कल्याण-शिळफाटा मार्गावर कटाई नाक्यादरम्यान मेट्रो व अनुषंगिक कामे करताना विजेचे खांब व वाहिन्या स्थलांतरित करण्याबाबत एमएमआरडीएने प्रस्ताव दिला होता. या प्रस्तावाला महावितरणने एप्रिल-२०२४ मध्ये १.३ टक्के डीडीएफ योजनेतून मंजुरी दिली. त्यानुसार रुंदिकरण करताना विजेचे खांब स्थलांतरीत करण्याची जबाबदारी एमएमआरडीएच्या विदयुत विभागाची आहे.

महावितरणची जबाबदारी केवळ संबंधित कामावर देखरेख ठेवण्यापर्यंत मर्यादित आहे. तर कामाच्या अंदाजपत्रकाला महावितरणकडून मे-२०२४ मध्ये मंजुरी देण्यात आली. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवून एमएमआरडीएकडून कंत्राटदाराची निवड करणे तसेच त्याच्याकडून विजेचे खांब व वाहिन्या रस्त्याच्या बाजुला स्थलांतरित करण्याची कार्यवाही होणे अपेक्षित होते. सातत्याने पाठपुरावा करूनही एमएमआरडीएने कंत्राटदाराची नियुक्ती केलेली नाही व देखरेख शुल्काचा भरणाही महावितरणकडे केलेला नाही.

ही वस्तुस्थिती असताना या रस्त्यावरील वाहतुक कोंडीसाठी विनाकारण महावितरणला दोष देण्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. वाहतुकीला अडथळा ठरणारे खांब व वाहिन्या स्थलांतरित करण्याच्या कामाची जबाबदारी एमएमआरडीएची आहे,

# मालकीची जागा गावकीला देत नाही म्हणून कुटुंबावर बहिष्कार

## बारशेत गावातील आठ जणांविरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील बारशेत येथील सुरेश लक्ष्मण खेराडे यांनी त्यांच्या मालकीची जागा गावाकीला दिली नाही म्हणून त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबियांवर गावकीने २०२३पासून सामाजिक बहिष्कार टाकला. या प्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात गावच्या ग्रामस्थ कमिटीमधील आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरेश लक्ष्मण खेराडे हे रोहा तालुक्यातील बारशेत गावात कुटुंबासह राहतात. बारशेत गावठाणामध्ये त्यांचे स्वत:चे घर आहे. या गावात त्यांची कागदोपत्री मालकीची जमीन आहे, मात्र गावातील लोक या जमिनीवर दावा सांगत आहेत. ही जमीन देण्यास सुरेश खराडे यांनी नकार दिला. त्यामुळे गेल्या दोन वर्षांपासून गावकीने त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला आहे.

सुमारे ८० वर्षांपूर्वी गावच्या खोताने गावकीची म्हणून विश्वासाने सुरेश खेराडे यांच्या आजोबांच्या नावे जमीन केली होती. गावाने आपल्याशी बोलावे, आमच्याशी नीट राहावे म्हणून यापूर्वीच गावाच्या दबावात सुरेश खेराडे यांनी १५हून अधिक एकर जमीन गावाच्या नावावर केली आहे. अजूनही त्यांची १५हून अधिक एकर जमीन नावावर करण्यास दबाव टाकला जात आहे. त्यास रमेश खेराडे यांनी विरोध दर्शविला. त्यामुळे २०२३पासून त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबियांवर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला. गावाने त्यांच्या कुटुंबियांशी संबंध तोडले. गावातील सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होण्यास त्यांच्या कुटुंबियांना बंदी घालण्यात आली. त्यांच्यासोबत बोलणाऱ्यांना ५० हजार रूपये दंड करण्याची धमकी देण्यात आली तसेच रमेश यांच्या मुलाचा केबल व इंटरनेटचा व्यवसाय आहे. त्याच्याकडून केबल व इंटरनेट कनेक्शन घेण्यास बंदी घालण्यात आली आहे. गावातील बचत गटातून सुरेश यांच्या पत्नीला काढून टाकण्यात आले आहे. गावगाड्याचे नियम समजून त्यांनी चर्चेतून मार्ग काढण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला, परंतु मार्ग काढण्याऐवजी त्यांना विविध सण-समारंभांमधून वगळणे, त्यांच्या शेतावर कामाला न येणे, त्यांच्या कुटुंबातील कुणाही व्यक्तीशी न बोलणे, गावातील कुणी बोलल्यास त्याला बैठकीत बोलावून दरडावणे किंवा त्या व्यक्तीलाही बहिष्कृत करण्याची धमकी देणे इत्यादी प्रकार सुरू होते.

१५ मार्च २०२५ रोजी ग्रामस्थ मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली होती. या सभेत गावाच्या विविध खर्चाचा हिशेब, कर्जाऊ घेतलेली रक्कम गोळा करणे, पुन्हा कर्ज देणे असा व्यवहार झाला. सुरेश यांनी या सभेत २५ हजार रूपये कर्ज मागितले ते देण्यास नकार देण्यात आला. गावकी ऐकतच नाही, म्हणून सुरेश खराडे यांनी रोहा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली.

ग्रामस्थ कमिटीमधील नारायण पवार, विजय पवार, तनिल पवार, भगवान पवार, सुधीर आगरे, भास्कर पवार, शांताराम खेराडे, प्रकाश कदम यांनी संगनमत करून बारशेत गावातील गावकऱ्यांना आमच्या कुटूंबावर सामाजिक बहिष्कार टाकण्यास प्रवृत्त केले आहे. गावात वावरताना आमच्या कुटुंबियांना भीती वाटते, एक प्रकारच्या दहशतीत आम्हाला जगावे लागते आहे. या प्रकरणाची दखल घेऊन संबंधितांवर उचित कायदेशीर कारवाई करून आम्हाला न्याय द्यावा, असे सुरेश खेराडे यांनी तक्रारीत म्हटले आहे. याची दखल घेऊन रोहा पोलीस ठाण्यात नारायण पवार, विजय पवार, तनिल पवार, भगवान पवार, सुधीर आगरे, भास्कर पवार, शांताराम खेराडे, प्रकाश कदम यांच्या विरोधात न्याय संहिता कलम ३५१ (२), १२६ (२), ३ (५) व सामाजिक बहिष्कार अधिनियम २०१६चे कलम ५ अन्वये २८ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**माणगाव, मुंबई : राज्याचे रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांनी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली. या वेळी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, युवासेना कोअर कमिटी राज्य सदस्य विकास गोगावले उपस्थित होते.**

# मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाद्वारे शिक्षकांना प्रशिक्षण



**अलिबाग : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (मुंबई)च्या वतीने ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी तीन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. संग्रहालयात उपलब्ध असणारी माहिती शिक्षकांनी त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावी, असे या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट होते.

इतिहास, विज्ञान, संस्कृती आणि कला यांसारख्या विषयांमध्ये ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांची रुची वाढवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाने हा अभिनव उपक्रम राबविला. या प्रशिक्षण वर्गात महाराष्ट्रातील आठ जिल्ह्यांमधील शिक्षकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये अलिबागमधील चार शिक्षकांची निवड करण्यात आली होती. प्रशिक्षण सत्रास कोलगाव येथील आरझीपी स्कूलचे रणजीत मळवी, मांडवा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विश्वास पाटील, रायगड जिल्हा परिषद शाळेचे विजय पाटील आणि नित्यनाथ म्हात्रे यांचा समावेश होता.

शालेय शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या सहकार्याने या कार्यक्रमात महाराष्ट्रातील आठ जिल्ह्यांतील २० शाळांमधून ३५ शिक्षक सहभागी झाले होते. यामध्ये नाशिकसह सातारा, यवतमाळ, धुळे, अलिबाग (रायगड), अमरावती, रत्नागिरी आणि अहिल्यानगर येथील शिक्षकांचा समावेश होता. संवादात्मक कार्यशाळा, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालील सत्रे आणि प्रत्यक्ष क्रियाकलापांच्या माध्यमातून शिक्षकांना संग्रहालयातील वस्तू आणि सांस्कृतिक वारसा स्थळे यांचा शिक्षणात कशाप्रकारे उपयोग करता येईल याचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणाचा भाग म्हणून शिक्षकांनी भाऊ दाजी लाड संग्रहालय, नेहरू विज्ञान केंद्र आणि एलिफंटा लेणी या स्थळांना भेट दिली. हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत आहे. विद्यार्थ्यांमध्ये संग्रहालयातील अभ्यासाची उत्सुकता, तर्क शुद्ध विचार आणि सांस्कृतिक जागरूकता वाढवण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

कार्यक्रमाबद्दल छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे संचालक सब्यसाची मुखर्जी म्हणाले, संग्रहालयामध्ये इतिहास, विज्ञान आणि संस्कृती यांना एकत्र आणता येते. या उपक्रमाद्वारे आम्ही शिक्षकांना त्यांची शिक्षण पद्धती अधिक आकर्षक आणि सर्जनशील करण्यासाठी ज्ञान आणि साधने प्रदान करू इच्छित आहोत. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय भारतीय शिक्षणाला अधिक सुलभ आणि आकर्षक बनवण्यासाठी सतत कार्यरत आहे.

या संग्रहालयाने शिक्षण क्षेत्रात अनेक उपक्रमांद्वारे योगदान दिले आहे. म्युझियम ऑन व्हील्स या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील अनेक शाळांमध्ये संग्रहालयातील अनुभव विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवले आहेत.

गेल्या तीन दिवसांमध्ये पार पडलेला प्रशिक्षण कार्यक्रम संग्रहालयाच्या या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना संस्कृती आणि आपला ऐतिहासिक वारसा शिक्षणाद्वारे अधिक उपलब्ध करणे हेच या प्रशिक्षण वर्गाचे उद्दिष्ट आहे.

# माथेरानच्या जंगलात शेकरू झाले उदंड!

**माथेरान : बातमीदार**

माथेरानमध्ये येणारा पर्यटक निसर्गाचा मनमुराद आनंद घेण्यासाठी येत असतो. आता पर्यटकांच्या आनंदात आणखी भर पडणार असून त्यांचा आनंद द्विगुणित होणार आहे, कारण माथेरानच्या निसर्गात वन संपत्तीचा अमूल्य ठेवा असणारा राष्ट्रीय प्राणी शेकरू उर्फ ऋतुफा प्राण्यांची संख्या वाढली आहे. या पर्यटन हंगामात माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांसाठी ही एक पर्वणी आहे.

सह्याद्रीच्या पर्वतरांगेतील निसर्गरम्य पर्यटनस्थळ म्हणजे माथेरान. या माथेरान नावातच समृद्ध जंगल अधोरेखित आहे. त्यामुळे इतर पर्यटनस्थळांपेक्षा माथेरान हे अतिशय वेगळे आहे. येथे असलेली उंच उंच झाडे ही फक्त माथेरानमध्येच दिसतात. त्यावर बागडणारे पक्षी, प्राण्यांमुळे माथेरान अधिक खुलून दिसते. या ठिकाणी भरपूर प्रमाणात व मोठे जंगल परिसर आहे तसेच येथे वनविभागामार्फत जंगलाचे संरक्षण करण्यात येते. त्यामुळे शिकारीसाठी



मज्जाव करण्यात आलेला आहे. म्हणूनच येथील जंगलात माकडे, वानर, भेकर, रानडुक्कर, रानमांजर, ससा, मुंगूस, घोरपड असे जीव सर्रास नजरेस पडतात.

याच जंगलात वास्तव्य करीत असलेले राष्ट्रीय प्राणी शेकरूसुद्धा सहज डोळ्यांनी पहावयास मिळत आहेत. माथेरानमध्ये आता काही दिवसांमध्ये येथील मुख्य पर्यटन हंगाम सुरू होत आहे. या हंगामात पर्यटकांना ही सुखद पर्वणी अनुभवता येणार आहे. माथेरान शहराचे प्रवेशद्वार असणारे दस्तुरी नाका, अमन लॉज रेल्वेस्थानक, मंकी पॉईंट, सिमसन तलाव परिसर, गारबट पॉईंट परिसर, वन ट्री हिल पॉईंट परिसरातील जंगल भागात उंच झाडांवर शेकरूंची घरे दिसतात. त्यांची घरे छोट्या काठ्यांपासून उंच झाडावर बनवलेली असतात.

परिसरात जितकी शेखरूंची घरे दिसतील त्यावरून शेखरूंचे वास्तव्य वाढले आहे की कमी झाले आहे हे समजते. त्याचबरोबर हा प्राणी सकाळच्या वेळेत जास्त प्रमाणात पहावयास मिळतो आणि टक टक टक टक टक असा आवाज करीत तो झाडांच्या फांद्यांवरून फिरताना सहज नजरेस पडतो, अशी माहिती माथेरान निसर्गमित्र संस्थेचे अध्यक्ष पवन गडवीर यांनी दिली. ते पुढे असेही म्हणाले की, माथेरान जंगलात प्राणी वाढत आहेत.

# जेएसएसच्या माध्यमातून जनसामान्यांचा सन्मान -डॉ. मेधा सोमय्या

## कौशल्य दीक्षांत सोहळा उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून नुकताच मुख्य कार्यालय अलिबाग सहाण या ठिकाणी कौशल्य दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी जेएसएस योजनेच्या माध्यमातून जनसामान्यांचा सन्मान होत असल्याचे मत डॉ. मेधा सोमय्या यांनी व्यक्त केले, तर जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या व्यवसाय प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे मत डॉ. नितीन गांधी यांनी व्यक्त केले.



माजी विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षण व अत्याधुनिक कौशल्य प्रशिक्षणाची प्रेरणा निर्माण करण्यात आली. समाजातील तळागाळातील निरक्षर, अपूर्ण खंडित शिक्षण झालेल्या व जेएसएस रायगडच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. दुर्लक्षित प्रशिक्षणार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाची प्रेरणा जागृत व्हावी, शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळावे तसेच उच्च पदवी प्राप्ती वातावरण निर्मितीचे स्वरूप त्यांना कळावे या उद्देशाने सदर समारंभाचे स्वरूप दीक्षांत समारंभासारखे करण्यात आले होते. ४००पेक्षाही जास्त विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत जेएसएस रायगड चा कौशल्य दीक्षांत सोहळा उत्साहात झाला. उपस्थितांचे आभार संचालक डॉ. विजय हिरामण कोकणे यांनी मानले.

जेएसएसच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमय्या यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकास योजनेच्या अंतर्गत कौशल्य दीक्षांत सोहळा कार्यक्रम राबवित असताना उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, बँक ऑफ इंडिया लीड बँक मॅनेजर विजय कुलकर्णी, बोर्ड मेंबर नरेन जाधव, ॲड. नीला तुळपुळे, सीमा विशे, संजय राऊत, दत्तात्रेय नाईक, संचालक डॉ. विजय कोकणे या व्यवस्थापक मंडळाबरोबरच कर्मचारी व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# दहिवली विचार मंचकडून उल्हास नदीची स्वच्छता

**कर्जत : प्रतिनिधी**

दहिवली गाव परिसर विचारमंच आणि कर्जत नगरपालिका प्रशासनाचे संयुक्त विद्यमाने येथील जीवनवाहिनी उल्हास नदी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या वेळी ९३५ किलो कचरा काढण्यात आला.



नगरपालिका प्रशासनाचे कार्यालीन अधीक्षक रवींद्र लाड, स्वच्छता अधिकारी रूपेश भोईर, सुनील लाड; तर दहिवली ग्रामस्थ व विचारमंच समुहाचे सुनील जाधव, शशांक शेट्टी, प्रवीण गांगल, विकास चित्ते, दिनेश कडू, अशोक घोंगे-पाटील, अशोक पवार, मिलिंद चिखलकर, स्वाती कदम-शिंदे, लता कुलकर्णी, शामकांत कदम, भरत बामणे, दिपंकार सालये, गणेश कनोजे, सुरेश खानविलकर, दामोदर उर्फ आप्पा कारूळकर, सखाराम सोनवणे, राहुल गायकवाड, नितीन शिंदे, जयप्रकाश जाधव, संजय चंदने, भाऊ कर्वे यांनी नदी स्वच्छता अभियानात सहभाग घेतला.

या वेळी स्वच्छता मुकादम निकेश फाळे, सफाई कामगार परेश गरूडे, अमोल जाधव, आकाश परदेशी, प्रज्वल सोनावणे, तेजस सोनावणे, श्रीकांत वाघेला, केतन गायकवाड, रवी सरावते, अनिल चंदन, रवी गायकवाड, विश्वदीप रणदिवे, कुमार परदेशी, धीरज चौधरी, अरविंद पादीर यांनी स्वच्छतेसाठी मोहिमेत सहभाग घेतला.

या मोहिमेत अतिशय दुर्गंधी सुटलेल्या प्लास्टिक पिशव्या, निर्माल्य असलेल्या पिशव्या, वाहून आलेली तसेच अडकलेली मोठी झाडे व ओंडके, पाण्याच्या बाटल्या, काचेच्या बाटल्या, टाकलेली कापडे काढण्यात आली. पुलावरून व आजूबाजूने टाकण्यात आलेला कचरा त्यात मुख्यतः प्लास्टिक, जुने सामान, निर्माल्य याचा समावेश होता.

यापुढे नदी स्वच्छ कशी राहील यासाठी प्रत्येक नागरिकाने लक्ष द्यावे व आपली सामाजिक जबाबदारी पार पाडावी. अशा मोहिमा विचारमंच समुहाकडून घेतल्या जातात, पण नदीत कचरा टाकणारे व नदी घाण करणारे काही नागरिक यांनी आता काहीही टाकू नये, असे आवाहन करण्यात आले

## जिवंत सातबारा मोहिमेस सहकार्य करण्याचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

१०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत जिवंत सातबारा मोहिम १ ते १० एप्रिल या कालावधीत राबविण्याबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्यात आला आहे. या मोहिमेसाठी तहसीलदार यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या मोहिमेंतर्गत सर्व ग्राम महसूल अधिकारी त्यांच्या सजातील गावांमध्ये चावडी वाचन करून गावनिहाय मयत खातेदारांच्या याद्या तयार करणार आहेत. मुरुड तालुक्यात याशिवाय मोहिम कालावधीत ७/१२वरील खालील नोंदीच्या बाबतीत सुद्धा कार्यवाही करण्यात येणार आहे. यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार रोहन शिंदे यांनी केले आहे.

# माथेरानमध्ये वसंतोत्सव; विविध कार्यक्रम

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये साडेतीन मुहूर्तापैकी एक चैत्र गुडीपाडवा या सणापासून वसंतोत्सवाला सुरुवात झाली आहे. माथेरान ग्रामस्थ उत्सव मंडळाच्या माध्यमातून मराठी वर्षातील पहिला दिवस असलेला चैत्र गुडीपाडवा या दिवसापासून श्रीराम नवमी ते हनुमान जन्मोत्सवापर्यंत येथील श्रीराम मंदिरात वसंतोत्सव साजरा होत आहे. यानिमित्तराने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



गेल्या अनेक दशकांपासून माथेरानमध्ये ग्रामस्थ मंडळाच्या वतीने वसंतोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा होत असून वसंतोत्सवाचा मोठा उत्साह येथील नागरिकांमध्ये पहावयास मिळतो. मुख्य बाजारपेठेतील श्रीराम मंदिराला विद्युत रोषणाई करून सजविण्यात आले आहे. मराठी वर्षातील पहिला दिवस असलेल्या चैत्र गुडीपाडवा या दिवशी पहाटे ५ वा काकड आरतीपासून या वसंतोत्सवाला सुरुवात झाली आहे. यानंतर अनेक वर्षांची परंपरा असलेल्या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मग ३ एप्रिल रोजी श्रीराम मंदिरात सत्यनारायणाची पूजा होईल. ६ एप्रिलला श्रीराम नवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये मंदिरात श्रीराम जन्मोत्सव साजरा करून सायंकाळी पालखी सोहळा रंगतो. संपूर्ण माथेरानकर या पालखी सोहळ्यात सहभागी होत असतात. यानंतर १२ एप्रिल रोजी हनुमान जयंतीनिमित्त पहाटे जन्मोत्सव साजरा केला जाणार आहे. सायंकाळी पालखी सोहळा होईल.

वसंतोत्सवातील धार्मिक कार्यक्रमात ग्रामस्थ उत्सव मंडळ अध्यक्ष प्रकाश सुतार, उपाध्यक्ष सुहासिनी शिंदे आणि सर्व कार्यकारिणी विशेष मेहनत घेत आहे. माथेरानमधील या वसंतोत्सवात ज्येष्ठ नागरिक, महिला, पुरुष यांच्यासह बाळगोपाळ मंडळीदेखील सहभागी झाली आहेत.

